R.No.MAHMAR/25/A3029

दैनिक

# महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर | वर्ष ५ वे | अंक ११३ | गुरूवार दि.१३ नोव्हेंबर २०२५ | पृष्ठे ४ | स्वागत मूल्य २ रू.




## अजित पवारांना आता मोदी, शाह आणि देवेंद्र फडणवीसही वाचवू शकणार नाही; दमानियांचा थेट इशारा



पार्थ पवार यांच्या पुण्यातील जमीन व्यवहार प्रकरणानंतर आता सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी पत्रकार परिषद घेत गंभीर आरोप केले आहेत. यावेळी त्यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना आता पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसही वाचवू शकणार नाहीत, असा थेट इशारा दिला आहे.

अंजली दमानिया म्हणाल्या, मी सिंचन घोटाळा, महाराष्ट्र सहकारी बँक घोटाळा बाहेर काढणार आहे. अजित पवारांच्या आजवरच्या घोटाळ्यांविरोधात उच्च न्यायालयात दाद मागणार आहे. अजित पवार यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सिंचन घोटाळ्यातून वाचवलं. मात्र, यावेळी त्यांना कोणीही वाचवू शकणार नाही.

मी जे घोटाळे बाहेर काढणार आहे, जे पुरावे सादर करणार आहे, ते केल्यानंतर आता अजित पवार पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस किंवा आणखी कोणाकडेही गेले तरी त्यांना कोणी वाचवू शकणार नाही. मी याप्रकरणी न्यायालयाच्या आदेशांद्वारे कारवाई होईल याची काळजी घेणार आहे. एकाही खटल्यामधून त्यांना बाहेर येऊ देणार नाही, असा थेट हल्लाबोलच दमानिया यांनी अजित पवार यांच्यावर केला आहे. उपमुख्यमंत्रिपद आणि पालकमंत्रिपदाचा राजीनामा द्यावा पुढे अंजली दमानिया यांनी म्हटले की, या जमीन व्यवहार प्रकरणात एक समिती स्थापन करण्यात आली. मात्र, सहापैकी पाच सदस्य हे पुण्यातील आहेत. पुण्याचे पालकमंत्री अजित पवार असताना राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार असताना ही कमिटी चौकशी करू शकेल का? निपक्ष चौकशी ही समिती करू शकेल का? यामुळेच माझी पहिली मागणी आहे की, अजित पवारांनी उपमुख्यमंत्रिपदापासून ते पालकमंत्रिपदापर्यंत ताबडतोब राजीनामा द्यावा. शीतल तेजवानी नावाच्या व्यक्तीने जिल्हाधिकाऱ्यांना या जमिनीबद्दल पत्र दिले होते.

## लातूरमध्ये लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त आयोजित पदयात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद

लातूर :- देशाच्या एकात्मतेचे प्रतिक आणि लोहपुरुष म्हणून ओळखले जाणारे सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त लातूर शहरात पदयात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या पदयात्रेला शहरातील विविध महाविद्यालये, शाळा, स्वयंसेवी संस्था आणि नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. पदयात्रेची सुरुवात यशवंत विद्यालय आणि दयानंद कला महाविद्यालयाच्या संगीत विभागातर्फे सादर करण्यात आलेल्या देशभक्तीपर गीताने करण्यात आली. उपजिल्हाधिकारी सायली ठाकूर यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून जिल्हा क्रीडा संकुल येथून पदयात्रेला प्रारंभ झाला. केंद्र शासनाचे युवा कार्य व क्रीडा मंत्रालय, लातूर जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर मेरा युवा भारत केंद्र, राष्ट्रीय सेवा योजना क्षेत्रीय निर्देशनालय आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने या पदयात्रेचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हा क्रीडा संकुल मैदानापासून छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्कपर्यंत पदयात्रा काढण्यात आली. हातात तिरंगा आणि सरदार पटेल यांचे छायाचित्र घेऊन विद्यार्थ्यांनी दिलेल्या देशभक्तीपर घोषणांमुळे संपूर्ण वातावरण देशभक्तीमय झाले. कार्यक्रमाच्या शेवटी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकण्यात आला आणि राष्ट्रगीताने पदयात्रेची सांगता झाली. लातूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी समीरसिंह साळवे, जयक्रांती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीधर कोल्हे, जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे, जिल्हा युवा अधिकारी सशांक रावुला, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम समन्वयक डॉ. केशव आलगुले, मेरा युवा भारत केंद्राचे संजय ममदापुरे, डॉ. बालाजी होकरणे, माध्यमिक शिक्षण विभागाचे श्री. ढमाले, डॉ. गौरव जवळीकर यावेळी उपस्थित होते. या पदयात्रेत यशवंत विद्यालय, श्री शिवाजी माध्यमिक विद्यालय, केशवराज विद्यालय, मारवाडी राजस्थान विद्यालय, श्री देशिकेंद्र विद्यालय, जयक्रांती महाविद्यालय, दयानंद वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, बसवेश्वर फार्मसी कॉलेज, राजर्षी शाहू महाविद्यालय, तसेच एन.सी.सी. आणि एन.एस.एस. विभागाच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महावीर काळे, प्रशांत साबणे प्रियंका मोरे, अश्विन स्वामी, रमेश शिंदे, संदीप भोसले आणि वेंकटेश हालींगे यांनी विशेष परिश्रम घेतले.








## रामेश्वर येथील विश्वधर्मी मानवता तीर्थ भवनात भगवान गौतम बुद्ध, छ. शिवाजी महाराज, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या मूर्तींची स्थापना







लातूर :- रयतेचे राजे आणि हिंदवी स्वराज्याचे निर्माते छत्रपती शिवाजी महाराज, विश्वाच्या कल्याणासाठीचे पंचशील तत्वज्ञान देणारे तथागत भगवान गौतम बुद्ध आणि मानव केंद्रबिंदू ठेवून खेड्यांच्या विकासातूनच राष्ट्र विकास होईल हा मूलमंत्र देणारे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचा आदर्श नव्या पिढीला प्रेरणादायी व्हावा आणि हाच आदर्श मानवातील स्नेहभाव वृद्धिंगत करण्यासाठी उपयोगी पडेल हे जाणून विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड यांनी त्यांच्या मूर्तींची स्थापना रामेश्वर(रूई) येथे उभारण्यात आलेल्या 'विश्वधर्मी मानवता तीर्थ भवनात' केली.

विश्व शांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे भारत व मानवता तीर्थ रामेश्वर (रूई) यांच्या संयुक्त विद्यमाने जगातील सर्वात मोठ्या आणि विस्तीर्ण दालन असलेल्या 'विश्वधर्मी मानवता तीर्थ भवन' या वास्तूमध्ये सत्य, शांती, अहिंसा, प्रेम आणि मानवतेचे मूर्तिमंत प्रतीक असलेल्या, मानवी इतिहासातील काही उत्तुंग व पथदर्शी व्यक्तिमत्वांच्या चैतन्यदायी प्रतिकांची या ठिकाणी प्रतिष्ठापना आणि पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विश्वधर्मी मानवतातीर्थ भवन या वास्तूचे संकल्पक, संरचना, नियोजक व निर्मितीकार एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड, प्रगतिशील शेतकरी हभप काशीराम दा. कराड, ऋषिकेश कराड, माईर्स एमआयटीचे कुलसचिव डॉ. रत्नदीप जोशी, वरिष्ठ सल्लागार डॉ. संजय उपाध्ये, गिरीश दाते, संचालक डॉ. महेश थोरवे, दिलीप पाटील, विष्णू भिसे, सचिन मुंडे व योगेश पारखी उपस्थित होते.

यावेळी विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले, गौतम बुद्धांचे विश्वशांतीचा संदेश देणारे तसेच पंचशीलाचे तत्वज्ञान जगाला मार्गदर्शक ठरणारे आहे. दया, क्षमा, शांती, त्याग, सेवा, समर्पणाच्या विचारांमध्येच अखिल मानव जातीचे कल्याण सामावलं आहे. तसेच स्वत्व आणि स्वाभिमान यांची शिकवणूक देत पर्यावरण स्नेही राज्याची निर्मिती करणारे रयतेचे राजे व हिंदवी स्वराज्याचे निर्माते छत्रपती शिवाजी महाराज यांचा प्रेरणादायी आदर्श हाच मानवातील स्नेहभाव वृद्धिंगत करण्यासाठी उपयोगी आहे. भारतीय संस्कृतीचे वसुधैव कुटुंबकम व एकं सत विप्रा बहुदा वदंती हा संदेशच जगाला विनाशापासन वाचवू शकतो. हाच संदेश रामेश्वर रूई येथे साकारलेल्या एकमेवाद्वितीय अशा 'विश्वधर्मी मानवतातीर्थ भवना' च्या माध्यमातून संपूर्ण जगाला देण्याचा छोटासा प्रयत्न आहे.

डॉ. रत्नदीप जोशी म्हणाले,जगामध्ये विद्वेषाची भावना वाढीस लागत असताना व्यक्ती व्यक्तींमधील सहसंवाद आणि स्नेहभाव वृद्धिंगत व्हावा यासाठी रामेश्वर रूई येथे विश्वधर्मी मानवता तीर्थ भवनाची संकल्पना डॉ. विश्वनाथ दा. कराड यांनी केली. त्याची निर्मिती हेच एक मोठे आद्भुत आश्चर्य आहे. ९० फूट रूंदीचा मधला सभागृहाचा भाग हा भारतातील एकमेव द्वितीय असून या सभागृहामध्ये शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक स्नेहभावाचे तसेच ग्रामीण जनतेची काळ्या मातीशी असलेली नाळ दिसून येते. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा साडेतीन फूटाचा अर्ध पुतळा विधिवत पूजन करुण बसविण्यात आला. तीन फूट सात इंचाचा अर्ध पुतळा हा पंचधातुंनी निर्मित केलेला असून त्याचे वजन १४४ किलो आहे. या मूर्तीला सुवर्ण जडीत करण्यात आले आहे. तसेच भगवान गौतम बुद्ध आणि राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची अप्रतिम व रेखीव मूर्तीची स्थापना करण्यात आली आहे.

## विलासराव देशमुख फाउंडेशनतर्फे लातूरमध्ये मोफत शिलाई प्रशिक्षण केंद्राचा (क्र. १३) शुभारंभ



लातूर / प्रतिनिधी :- विलासराव देशमुख फाउंडेशनच्या वतीने लातूर शहरातील महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी मोफत व्यावसायिक प्रशिक्षण देण्याच्या उपक्रमांतर्गत, प्रभाग क्रमांक १४ येथील तुळजाभवानी नगर, जुना औसा रोड येथे मोफत शिलाई मशीन प्रशिक्षण केंद्र क्र. १३ चा शुभारंभ करण्यात आला आहे. राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाने आणि ट्वेंटीवन ग्रीच्या संचालिका सौ. अदिती अमित देशमुख यांच्या संकल्पनेतून विलासराव देशमुख फाउंडेशनच्या माध्यमातून महिलांना रोजगाराची संधी मिळावी, यासाठी हे नवीन केंद्र सुरू करण्यात आले आहे. फाउंडेशन कडून महिलांना मोफत प्रशिक्षण देऊन स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचे महत्त्वपूर्ण काम करण्यात येत आहे.

८४ महिलांचा सहभाग

या प्रशिक्षण केंद्रामध्ये एकूण ८४ महिलांनी आपला सहभाग नोंदवला आहे. या ठीकाणी महिलांना शिलाईकामातील विविध पद्धती आणि तंत्रांचे सखोल प्रशिक्षण दिले जाणार आहे. या केंद्राचा शुभारंभ विलास को. ऑप.बँक लातूरचे चेअरमन ड. किरण जाधव यांच्या शुभहस्ते झाले. यावेळी संस्थेच्या समन्वयक संगीता मोळवणे, अविनाश देशमुख, विक्रम बिराजदार, चंद्रज्योती बिराजदार, उर्मिला मुगळे, ट्रेनर क्रांती उफाडे ठाकूर, जगताप आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सविता कुलकर्णी यांनी केले, तर संगीता कदम, पूजा गोरे, लक्ष्मी काटकर, अलका राजेगावे या महिलांनी आपले मनोगत व्यक्त केले. संस्थेचे सोशल प्लॅनर गजानन बोयणे आणि प्रभागातील मोठ्या संख्येने महिला या उद्घाटन सोहळ्याला उपस्थित होत्या.

### स्थानिक 'रणसंग्राम'! काँग्रेस पक्षाचा पहिला नगराध्यक्ष पदाचा उमेदवार ठरला


स्थानिक निवडणुकीची उत्सुकता आता शिगेला पोहचली असून, सर्वच राजकीय पक्षांनी या निवडणुकीसाठी कंबर कसली आहे. या निवडणुकीत स्थानिक पातळीवर राजकीय चित्र फार वेगळे आहे. त्यामुळे राजकीय युती कोणासोबत करायची याचा निर्णय स्थानिक नेत्यांवर सोपविण्यात आला आहे.

### टि.सी.हरवली आहे

संजय दासू शिंदे या नावाची स्वामी दयानंद कनिष्ठ विद्यालय, लातूर येथून पास झालेली बारावीची टि. सी.रेणापूर ते शिवाजी चौक लातूर या प्रवासात हरवली आहे.कोणास मिळून आल्यास खालील मोबाईल क्रमांकावर संपर्क करावा
मोबाईल क्रमांक
९४२३४४८०१८

## महाराजा महाविहार कान्हेरी बौद्ध लेणी अभ्यास दौरा





नवी मुंबई / के. एच. हनवते :- बंधू-भगिनींनो, आज आपण एका अभूतपूर्व, ज्ञानवर्धक आणि अत्यंत यशस्वी अशा 'महाराजा महाविहार कान्हेरी बौद्ध लेणी अभ्यास दौऱ्या'चे साक्षीदार झालो आहोत. या संपूर्ण उपक्रमाचे सर्व श्रेय धम्म मेत्ता संघाच्या अथक परिश्रमाला आणि धम्म निष्ठांना जाते. आजचा हा दिवस, ७ नोव्हेंबर २०२५, केवळ कॅलेंडरवरील एक तारीख नव्हती, तर तो बौद्ध इतिहासाच्या सुवर्ण पानांमध्ये नोंदवला गेलेला एक 'धम्म-उत्सव' होता. कान्हेरीच्या हिरव्यागार, शांत पर्वतरांगांमध्ये, १०९ लेण्यांच्या या विशाल समूहामध्ये, जेव्हा भारत आणि श्रीलंका येथील भिक्खू-भिक्खुणींचा संघ एकत्र आला, तेव्हा तो क्षण प्रत्यक्ष धम्म-संवादाचा आणि विश्वबंधुत्वाचा अनुभव देणारा होता. चैत्यगृह क्र. ३ मध्ये केलेले सामूहिक त्रिशरण पंचशील: लेण्यांच्या भव्य प्रवेशद्वारातून आत शिरल्यावर, प्राचीन स्तूपासमोर, वंदनीय महाथेरींच्या मार्गदर्शनाखाली जेव्हा आम्ही सर्वजण एका सुरात त्रिशरण पंचशील घेतले, तेव्हा वातावरण पवित्र ऊर्जेने भारून गेले होते. तो केवळ एक विधी नव्हता, तर दोन हजार वर्षांपूर्वीच्या धम्म-शक्तीची अनुभूती होती.

येथे भिक्खू संघांनी केलेले सखोल मार्गदर्शन हे दौऱ्याचे सर्वात मोठे यश होते. केवळ इतिहास नव्हे, तर प्रत्येक शिल्प आणि शिलालेख आपल्याला काय धम्म-संदेश देतो, हे समजावून सांगताना, 'धम्म मेत्ता' चा खरा अर्थ आम्हाला उमगला.

श्रीलंका देशातील वंदनीय महाथेरी सद्दा सुमना भिक्खुणी यांची उपस्थिती हा आमच्यासाठी महागुलमोहर ठरला. त्यांच्या वाणीतून आलेले मार्गदर्शन आणि त्यांचे आशीर्वाद हे भारत-श्रीलंका धम्मसंबंधांना दृढ करणारे ठरले. हा प्रसंग धम्माच्या सार्वत्रिकत्वाचा जयजयकार करणारा होता. धम्म मेत्ता संघ, आपण या दौऱ्याचे आयोजन करून केवळ अभ्यास दौरा पूर्ण केला नाही, तर धम्म-संस्काराचे मोठे कार्य केले आहे.

सकाळी वेळेवर सुरू झालेला प्रवास, भोजनाची सात्विक व्यवस्था आणि लेण्यांच्या माहितीचे सुस्पष्ट नियोजन... हे सर्व आपल्या समर्पण आणि कार्यक्षमतेची साक्ष देते.

आपण नवीन पिढीला या प्राचीन वारशाशी जोडून, त्यांना बुद्धाच्या शांती आणि करुणेच्या मार्गावर चालण्याची प्रेरणा दिली आहे. हे सर्व ज्ञान आणि अनुभव सूरज जगताप सर, काटे सर आणि कांबळे सर यांच्या प्रभावी मार्गदर्शनामुळे आमच्या स्मरणात अधिक भर पडली तसेच, रोशना ताईंच्या उत्कृष्ट आयोजनामुळे शांत व निवांत वातावरणात हा अभ्यास शक्य झाला. हा दौरा केवळ पर्यटन नव्हे, तर तो धम्म आणि इतिहासाच्या प्रवासाचा एक अविस्मरणीय टप्पा होता. कान्हेरीच्या या पवित्र भूमीत, धम्माच्या अभ्यासासाठी एक उत्कृष्ट आणि प्रेरणादायक व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याबद्दल, धम्म मेत्ता संघाचे मनःपूर्वक अभिनंदन! आपले हे स्तुत्य कार्य असेच अविरत चालू राहो आणि अनेक लोकांना धम्माच्या प्रकाशात घेऊन येवो, हीच सदिच्छा! साधु! साधु! साधु!

महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

# संपादकीय

## केरळचा गरिबीमुक्तीचा आदर्श

के. श्रीनिवासन केरळ या नितांत सुंदर निसर्गाने नटलेल्या राज्याचा साक्षरता दर ९६.२ टक्के इतका असून तो देशात सर्वाधिक आहे. येथे शालेय शिक्षण सोडणार्यांचे प्रमाण अत्यंत कमी आहे. ‘साक्षरता मिशन’ आणि ‘अक्षरलक्ष्यम’सारख्या उपक्रमांमुळे या राज्याने प्रौढ निरक्षरतेवर नियंत्रण मिळवले. या शैक्षणिक क्रांतीनंतर केरळने आता सामाजिक कल्याण क्षेत्रात देशासाठी आदर्श निर्माण केला आहे. मुख्यमंत्री पिनराई विजयन यांनी विधानसभा अधिवेशनात एक महत्त्वपूर्ण घोषणा केली. त्यानुसार केरळ हे राज्य अत्यंत गरिबीच्या सावटातून मुक्त झाले आहे. अशा प्रकारची किमया साधलेले हे देशातील पहिले आणि एकमेव राज्य आहे. गेल्या चार वर्षांपासून राबविलेल्या एक्स्ट्रीम पॉव्हर्टी इरॅडिकेशन प्रोग्राम या उपक्रमाचा सुपरिणाम म्हणून याकडे पाहिले जात आहे. यामध्ये अतिगरिबी दूर करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवक, आरोग्य विभाग आणि शिक्षण विभाग यांनी एकत्रितपणे काम केले.

२०२१ मध्ये सुरू झालेल्या या प्रकल्पाला डाव्या आघाडीच्या (एलडीएफ) सरकारच्या पहिल्या कॅबिनेट बैठकीत मान्यता मिळाली होती. राज्यातील कोणताही नागरिक अन्न, निवारा, आरोग्य किंवा उत्पन्नाच्या अभावामुळे वंचित राहू नये, असे उद्दिष्ट ठेवले होते. राज्यभर मोठे सर्वेक्षण राबविले गेले. केरळ इन्स्टिट्यूट ऑफ लोकल ॲडमिनिस्ट्रेशनच्या मार्गदर्शनाखाली सुमारे ४ लाख गणक नेमले. त्यांनी घराघरात जाऊन अन्न, आरोग्य, उत्पन्न आणि निवास या चार मूलभूत मापदंडांवर माहिती गोळा केली. ज्या कुटुंबांकडे हे चारही घटक नव्हते ते अत्यंत गरीब म्हणून ओळखले गेले. एकूण ६४,००६ कुटुंबे अत्यंत गरीब म्हणून नोंदवली गेली. त्यामध्ये १,०३,०९९ व्यक्ती होत्या. त्यापैकी ४३,८५० एकल सदस्यीय कुटुंबे होती. स्थलांतर, मृत्यू आणि पडताळणीनंतर अंतिम आकडा ५९,२७७ वर आला. या प्रत्येक कुटुंबासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मदतीने मायक्रोप्लॅन तयार केला. हे मायक्रोप्लॅन अल्पकालीन (तत्काळ मदत), मध्यमकालीन (तीन महिने ते दोन वर्षांत पूर्ण होणारी उद्दिष्टे) आणि दीर्घकालीन (स्थायी पुनर्वसन आणि आत्मनिर्भरता) असे होते. या उपक्रमांतर्गत ३९१३ कुटुंबांना घरे, १३३८ कुटुंबांना जमिनीसह निवास, ५६५१ कुटुंबांच्या घरांची दुरुस्ती आणि ४३९४ कुटुंबांना रोजगाराचे साधन दिले गेले.

राष्ट्रीय पातळीवर पाहता केरळचा हा उपक्रम भारताच्या गरिबी कमी करण्याच्या व्यापक प्रवासाशी सुसंगत आहे. वर्ल्ड बँकेच्या २०२५ च्या अहवालानुसार, गेल्या ११ वर्षांत भारताने २६.९ कोटी लोकांना अत्यंत गरिबीतून बाहेर काढले. २०११-१२ मध्ये देशात अत्यंत गरिबी दर २७.१ टक्के होता, जो २०२२-२३ मध्ये ५.३ टक्क्यांपर्यंत खाली आला. ग्रामीण भागात हा दर १८.४ टक्क्यांवरून २.८ टक्के झाला, तर शहरी भागात १०.७ टक्क्यांवरून १.१ टक्क्यांपर्यंत घसरला. नीती आयोगाच्या मल्टिडायमेन्शनल पॉव्हर्टी इंडेक्स २०२३ नुसार बिहारचा गरिबी दर ३३.७६ टक्के, झारखंडचा २८.८१ टक्के, उत्तर प्रदेशचा २२.९३ टक्के, मध्य प्रदेशचा २०.६३ टक्के आणि मेघालयाचा ३२.६७ टक्के आहे. या तुलनेत केरळने केवळ आर्थिक प्रगतीच नव्हे, तर मानवी विकास निर्देशांकातसुद्धा देशात अग्रक्रम राखला.

वर्ल्ड बँकच्या परिभाषेनुसार, ज्यांची दैनंदिन कमाई ३ अमेरिकन डॉलर म्हणजेच सुमारे २५७ रुपयांहून कमी आहे त्यांना अत्यंत गरीब मानले जाते. पूर्वी ही मर्यादा १७८ रुपये होती. विजयन यांच्या दाव्यानुसार, आता अशा प्रकारच्या कोणत्याही कुटुंबाचे अस्तित्व राज्यात उरलेले नाही. हे ध्येय साध्य करण्यासाठी सरकारने नुसते रोख हस्तांतरण नव्हे, तर लाईव्हलीहूड-ड्रिव्हन सपोर्ट सिस्टीम उभारली. यामध्ये बचत गट, कृषी सहकारी संस्था, चार लाख गणक, हजारो स्वयंसेवक आणि ग्रामपंचायतींचा थेट सहभाग होता. महिलांच्या स्वयंसेवी संघटनांनी विशेषतः कुटुंबश्री मिशनने अन्न किट वितरण, वैद्यकीय मदत आणि आर्थिक सल्ला केंद्रांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली. यामुळे केवळ अतिगरीब कुटुंबांचे पुनर्वसन झाले नाही, तर सामाजिक विश्वासनिर्मितीही प्रस्थापित झाली. ही गरिबीमुक्त स्थिती टिकवून ठेवण्यासाठी नियमित निरीक्षण, डेटा पुनर्पडताळणी आणि सामाजिक सहभाग वाढविण्याचे नियोजनही केले आहे. जी-२० पॅनेलच्या ताज्या अभ्यासानुसार, २००० ते २०२४ दरम्यान जगभरात निर्माण झालेल्या नवीन संपत्तीपैकी सर्वात श्रीमंत १ टक्के लोकांच्या हाती सर्वाधिक वाटा गेला, तर खालच्या ५० टक्के लोकांच्या हाती फक्त १ टक्के संपत्ती आली. भारत याला अपवाद नाही. देशातील सर्वात श्रीमंत १ टक्के लोकांच्या संपत्तीत गेल्या दोन दशकांत ६२ टक्के वाढ झाली. अशा पार्श्वभूमीवर केरळचा उपक्रम लक्षवेधी ठरतो. केरळचा सर्वसमावेशक दृष्टिकोन सर्वच राज्य सरकारांनी अंगीकारायला हवा. राजकीय इच्छाशक्ती आणि प्रशासकीय समन्वय एकत्र आले, तर दारिद्र्य निर्मूलनाचे अशक्यप्राय उद्दिष्ट पूर्ण होऊ शकते. लोककेंद्रित धोरणे, स्थानिक स्वराज्य संस्थांचा सक्रिय सहभाग आणि आर्थिक न्याय यांची सांगड घालून गरिबीमुक्त भारत हे स्वप्न वास्तवात उतरू शकते, हे केरळने सिद्ध केले आहे.

# सेवा, समता आणि शिक्षणाचा साक्षात प्रवास – ऋषितुल्य स्व. मलशेट्टीअप्पा पाटील नागराळकर

आज आपण एका खऱ्या समाजसेवक, विचारवंत आणि सर्वसामान्यांच्या आशेचा किरण ठरलेल्या स्व. मलशेट्टीअप्पा पाटील नागराळकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पवित्र स्मृतींना विनम्र अभिवादन करतो. त्यांचे जीवन म्हणजे सेवा, समता आणि शिक्षणाचा साक्षात प्रवास. स्व. नागराळकर यांनी आपले आयुष्य गरीब, शोषित आणि वंचित घटकांच्या उन्नतीसाठी समर्पित केले. छत्रपती शाहू महाराज, महात्मा ज्योतिराव फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा त्यांनी मनापासून स्वीकारला आणि तो ग्रामीण समाजजीवनात रुजविला. ते नेहमी सांगत समानता आणि शिक्षणाशिवाय समाज प्रगत होऊ शकत नाही.त्यांचा विचार आणि आचरण यामध्ये एकरूपता होती. ते फक्त नेता नव्हते, तर जनतेचे दिशादर्शक होते. समाजातील सर्व स्तरांतील लोकांच्या दुःखात ते सहभागी होत, त्यांच्या समस्या स्वतःच्या मानत. फक्त चौथीपर्यंत शिक्षण घेतलेले असूनही शिक्षणाचे महत्त्व त्यांनी ओळखले. त्यांनी महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाचे अध्यक्षपद स्वीकारून ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची दारे खुली केली. त्यांच्या कार्यकाळात हजारो विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाचा लाभ झाला. अनेक माजी विद्यार्थी सांगतात जर नागराळकर सर नसते तर आमचे शिक्षण थांबले असते. त्यांनी इमारती नव्हे, तर माणूस घडवणारा संस्कारधनाचा कारखाना उभा केला. १९६२ ते १९६७ दरम्यान ते उदगीर पंचायत समितीचे पहिले सभापती म्हणून कार्यरत होते. त्यांच्या नेतृत्वाखाली रस्ते, पाणी, शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रात नवे मापदंड निर्माण झाले. त्यांच्या न्यायनिष्ठ, पारदर्शक आणि सर्वसमावेशक कामकाजामुळे लोक त्यांना जनतेचा नेता म्हणत. उदगीर पंचायत समितीच्या सभागृहाला त्यांचे नाव देण्यात आले, ही त्यांच्या कार्याची शासनमान्यता आणि जनआदराचे प्रतीक आहे. स्व. नागराळकर यांच्या नेतृत्वाखाली नागराळ ग्रामपंचायत कायम बिनविरोध राहिली. ते म्हणत गावाचे विकासकाम हे कोणत्याही पक्षाचे नव्हे, तर सर्वांचे आहे. त्यांच्या काळात गावात राजकारण नव्हे, तर एकोपा आणि विकासाची भावना नांदली. कोणीही त्यांच्या दारी गेला की त्याला निराश परतावे लागले नाही त्यांचे घर म्हणजे जनतेसाठी खुले दरवाजे आणि न्यायाचा दरबार. मराठवाडा मुक्ती संग्रामातील स्वातंत्र्यसैनिकांना न्याय आणि सन्मान मिळावा यासाठी त्यांनी अविरत प्रयत्न केले. ते म्हणत ज्यांच्या रक्ताने मराठवाडा मुक्त झाला, त्यांचा सन्मान आपल्या श्वासात असला पाहिजे. त्यांच्या प्रयत्नांमुळे अनेक स्वातंत्र्यसैनिकांना



शासनमान्यता आणि गौरव मिळाला. स्व. नागराळकर हे सर्व धर्म, जाती, पंथांच्या पलिकडचे व्यक्तिमत्त्व होते. त्यांचा धर्म एकच मानवता.ते समाजातील तळागाळातील लोकांना सन्मानाने जगता यावे यासाठी झटले.त्यांचे विचार आजही प्रेरणादायी आहेत सेवा हीच खरी पूजा, आणि माणुसकी हीच खरी ओळख. आजचा तरुण वर्ग, समाजातील कार्यकर्ते आणि लोकप्रतिनिधींनी त्यांच्या जीवनाचा अभ्यास केला,तर समाजबदलासाठी नव्या ऊर्जा आणि प्रेरणेचा झरा मिळेल.त्यांनी दिलेली मूल्ये प्रामाणिकपणा, परिश्रम आणि सर्वसमावेशकता हीच आजच्या काळाची खरी गरज आहे.त्यांचा वारसा म्हणजे प्रेरणेचा अखंड झरा, जो आजही समाजाला दिशा दाखवतो. त्यांनी दाखविलेला मार्ग, दिलेली शिकवण आणि केलेली सेवा हीच त्यांच्या स्मृतीला खरी आदरांजली आहे.माणसासाठी माणूस जगला पाहिजे ही शिकवण देऊन जाणारे, स्व. मलशेट्टीअप्पा पाटील नागराळकर हे नाव आजही जनतेच्या अंतःकरणात जिवंत आहे.

-------------

दयानंद कांबळे नागराळकर

# जनता कोमात सायबर भामटे जोमात

आपल्या देशात सायबर चोरट्यांनी धुमाकूळ घातलेल्या बातम्या रोज आपल्या वाचण्यात येत आहेत. रोज कोणाला तरी फसवले जात असते. विशेषत: जण फसविले जाते ते सुशिक्षित आणि आर्थिक सधन असलेल्या व्यक्तींना जसे कोणी प्राध्यापक, कोणी डॉक्टर आहे, कोणी सेवा निवृत प्राध्यापिका अशा लोकांनाच बऱ्याच ठिकाणी फसविण्यात आलेले आहे.ते वेगवेगळे फसविण्याचे फंडे वापरत आहेत. लोकांना फसविण्यासाठी त्यांना. होती घातली जाते की तुमच्या आधार कार्डचा वापर करून बोगस खाते करून त्यावर अतिरेक्यांना रक्कम पाठवली जात असते.

किंवा तुमच्या पार्सलमध्ये अमलीपदार्थ सापडले आहे. त्यामुळे तुम्हाला केव्हाही अटक होऊ शकते. अटकेपासून तुम्हाला सुटका पाहिजे असेल तर अमुक अमुक खात्यावर अमुक एवढे लाख रुपये भरणा करावी.आणि ही बातमी कोणाशी शेअर करू नये.शेअर केलंत तुमची अटक नक्की ठरली असेच समजावे. अशी धमकी देऊन लोकांची लूट केलेली आहे. अटके पासून वाचण्यासाठी लोक फसत आहेत. सायबर चोरांचे कसे रॅकेट काम करीत असलेली बातमी वाचावयास मिळाली ती अशी सायबर भामटे जोमात. नवी दिल्ली : एखाद्याच्या मोबाईलवर अज्ञात नंबरवरून अचानक मेसेज धडकतो...

तुम्ही आठवड्याच्या शेवटी फ्री आहात का ,अर्धवेळ नोकरी शोधत आहात का ? असे त्यात विचारले जाते किंवा साध्या ' हॅलो ' ने सुरुवात होते. आता असे मेसेज पाठवण्या साठी आग्नेय आशियात काही कामगार १२- १६ तास सतत राबवत असतात. कोणीतरी अशा अमिषाला बळी पडेल ,या आशेने न थांबता ते संदेश पाठवत असतात. ✻ आग्नेय आशियात केंद्र , भव्य संकुलातून चालते फसवेगिरी.. सायबर भामट्यांचे अंतिम ध्येय अर्थातच तुम्हाला गंडा घालण्याचे असते. आतापर्यंत घोटाळ्यामध्ये बळी पडलेल्यांनी अब्जावधी रुपये गमावले आहेत. हे सायबर भामटे कामगार आग्नेय आशियामधील एखाद्या मोठ्या संकुलामधून ही हेराफेरी करतात.

✻ घोटाळेबाजांना आळा घालणे अवघड का ? + म्यानमारच्या लष्कराने गेल्या महिन्यात थायलंडच्या सीमेवरील भव्य केके पार्क येथे छापा मारून सर्वात कुप्रसिद्ध सायबर भामट्यांचा अड्डाच उध्वस्त केला. अशी धडक कारवाई होऊनही या संकुलातून सायबर भामटे सक्रिय आहेत, असा आरोप सामाजिक संस्था करत आहेत. + म्यानमार लष्कराच्या कारवाईनंतर या संकुलात काम करणारे १,५०० कामगार फरारी झाले. त्यापैकी शेकडो भारतीय होते. याशिवाय चिनी, फिलिपिनो ,व्हिएतनामी , इथीओपीयन, केनियाचे लोक आणि इतर राष्ट्रीयत्वाचे लोकही होते. हे सर्व थायलंडमध्ये घुसल्याचा दावा थाई लष्करी अधिकाऱ्यांनी केला. + थायलंड आता या सायबर भामट्यांना मायदेशी परत पाठवण्यासाठी भारत आणि इतर परदेशी सरकाऱ्या सोबत काम करत आहे. गुरुवारी कामगारांच्या सर्वात मोठ्या गटांपैकी एकाला भारतीय हवाई दलाच्या वाहतूक विमानांमधून मायदेशी पाठवण्यात आले आणि पुढील आठवड्यात आणखी काही परत येणार आहेत. ✻ असे असले तरी केके पार्क हे थाई- म्यानमार सीमेवरील अशा डझनवर केंद्रांपैकी एक होते आणि आग्नेय आशियातील शेकडो केंद्रांपैकी एक आहे. ✻ सायबर भामट्यांचे अड्डे....+ सायबर भामट्यांची ही केंद्रे बहुतांश वेळा ग्रामीण भागात असतात आणि तेथे त्यांची झोपण्याची सोय असते.

संकुलात दुकाने आणि कर्मचाऱ्यांसाठी मनोरंजन सुविधाही असते. एखादे भव्य संकुल उभारून त्यातील जागा विविध कर्मचाऱ्यांना भाड्याने देणे असा फंडा आहे. शहरांमधील अशी केंद्रे स्थानिक उच्चभ्रूंच्या संरक्षणाखाली काम करतात. कायदेशीर कार्यालयीन इमारतीच्या एखाद्या मजल्यावर किंवा भाड्याने घेतलेल्या घरात देखील रॅकेट सक्रिय असते.✻ ' या' अड्ड्यांचे मूळ कॅसिनोत..+ सायबर भामट्यांच्या अशा केंद्रांचे मूळ म्हणजे कॅसिनो. आग्नेय आशिया मध्ये सर्वत्र कॅसिनो पसरले आहेत. संयुक्त राष्ट्राच्या अमली पदार्थ आणि गुन्हेगारी कार्यालयाने २०२१ मध्येच ३४० हून अधिक परवानाधारक आणि विना परवाना कॅसीनोंची नोंद केली होती.

चीनमध्ये जुगार अवैद्य ठरल्यानंतर जुगारांचे लक्ष्य या कॅसिनोकडे वळले. अनेक कॅसिनो चिनी गुन्हेगारी टोळ्यांचं चालवतात. कोरोना महामारीच्या काळात कठोर प्रवास निर्बंधामुळे अशा कॅसिनोंचा बाजार उठला. ग्राहकांच्या कमतरतेमुळे त्याच्या चालकांनी मग ऑनलाइन कॅसिनोचे मॉडेल गुन्हेगारी कारवायाकडे वळवले. सायबर भामटेगिरी करून जगभरातील लोकांना गंडा घालण्याचे काम त्यांनी संघटितरित्या सुरू केले असेच म्हणावे लागेल. ✻ दोन लाख कामगारांची होते सायबर पिळवणूक ..(१) २०२३ च्या संयुक्त राष्ट्राच्या मानवाधिकार उच्चायुक्त कार्यालयाच्या अहवालानुसार ,म्यानमार मध्ये किमान १ लाख २० हजार कामगारांना सायबर भामटेगिरी करण्यासाठी सक्तीने अशा केंद्रावर डांबून ठेवले असण्याची शक्यता आहे.

याचप्रमाणे कंबोडियामध्ये आणखी १ लाख लोकांना अशाच प्रकारची कामे करण्यास भाग पाडण्यात येत आहे. जास्त पगार आणि सोपी कार्यालयीन कामे असे आमिष दाखवून बहुतेकांना या केंद्रात आणले जाते आणि मग त्यांना तेथून बाहेर पडणे अशक्य होते. सुरुवातीला हे कामगार चीन आणि चिनी भाषिक देशांमधून येत असत; परंतु आता संयुक्त राष्ट्रांच्या अमली पदार्थ आणि गुन्हेगारी कार्यालयाचे म्हणणे आहे की , हे कामगार इंडोनेशियापासून लायबेरियापर्यंत ५६ देशांमधून येतात. (२) हे कामगार पळून जाऊ नये म्हणून आधीच त्यांचा पासपोर्ट केंद्रचालक ताब्यात घेतात. जे कामगार काम करत नाहीत त्यांना मारहाण केली जाते किंवा इतर शारीरिक शिक्षाना सामोरे जावे लागते.

(३) घोटाळेबाज भेदभाव करत नाहीत. ते जगभरातील लोकांना गंडा घालतात. त्यांना कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे समर्थित भाषांतर साधनांचा चांगलाच फायदा होतो. ✻ मोठे मासे मोकाटच....या सायबर भामट्यांना आळा घालण्या साठी मोठ्या प्रमाणात कारवाई करूनही मुख्य गुन्हेगार अजूनही फरारी आहेत. आग्नेय आशिया आणि जगभरात घोटाळ्यांच्या केंद्रांचे कारनामे दररोज समोर येत आहेत. एकूणच या खेळातील मोठे मासे हाती लागत नसल्याने किंवा त्यांच्यावर कारवाई होत नसल्याने हा धंदा तेजीतच आहे.✻ अशी होते सायबर भामटेगिरी.....क्रिप्टोकरन्सीमधील गुंतवणुकीपासून ते ऑनलाईन टास्कच्या माध्यमातून सामान्य नागरिकांना फसवले जाते.

सुरुवातीला चांगला परतावा देऊन नंतर पुन्हा गुंतवणूक करण्यास प्रोत्साहन दिले जाते आताच गुंतवणूक न केल्यास मोठी संधी हातची जाईल ,अशी निकड दाखवली जाते. गुंतवणूक झाल्यानंतर अर्थातच त्यांना ब्लॉक केले जाते किंवा त्यांना पैसे परत मिळण्याचे सर्व मार्ग बंद केले जातात. ✻ राज्यात डिजिटल अरेस्टची २१८ प्रकरणे. मुंबई : देशात दिवसाआड एक व्यक्ती डिजिटल अटकेच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात आर्थिक फसवणुकीला बळी पडत आहे .पोलिसाकडे ' डिजिटल अरेस्ट ' ची तरतूदच नाही तरीही महिला, जेष्ठ नागरिकांची फसवणूक होत आहे.

✻ आकडेवारी काय सांगते ?...

(१) ' डिजिटल अटक ' ही केवळ फसवणूक असून आता ही साधारण बाब झाली आहे. डिजिटल अटकेमुळे देशात वैयक्तिकरित्या सर्वाधिक ५६ कोटी रुपये उकळले गेल्याची नोंद आढळते. राष्ट्रीय गुन्हे नोंद पोर्टलवरील आकडेवारी नुसार ,जानेवारी २०२५ ते ऑगस्ट २०२५ पर्यंत राज्यात डिजिटल अटकेची २१८ प्रकरणे नोंदवली गेली. (२) त्यापैकी ११४ प्रकरणे मुंबईतील आहेत . यापैकी २६ प्रकरणांचा छडा सायबर पोलिसांना लावता आला. ४९ जणांना अटक करण्यात आली आहे. ✻ ' डिजिटल अरेस्ट ' हा बनावट प्रकार...' डिजिटल अरेस्ट ' ( आभासी अटक) हा प्रकारच मुळी बनावट आहे. देशातीलच काय तर जगातील कुठलीही तपास यंत्रणा अशा पद्धतीचा वापर करत नाही. त्यामुळे या सायबर चोरट्यांच्यामुळे खेदाने म्हणावे लागते जनता कोमात सायबर भामटे जोमात

✻✻✻✻✻✻

लेखक
जी.एस.कुचेकर पाटील
भुईंज तालुका वाई जिल्हा सातारा
मो.न. ७५८८५६०७६१

# अयनी एअरबेसवरून गहजब का?

मध्य आशियातील ताझिकिस्तान येथे २००२ मध्ये भारताने अयनी एअरबेस विकसित केला होता. यासाठी २० वर्षांचा करार भारत आणि ताझिकिस्तानमध्ये झाला होता; परंतु ताझिकिस्तानने या कराराला मुदतवाढ देण्यास नकार दिल्याने भारताने या एअरबेसवरून आपले २०० सैनिक आणि सुखोई लढाऊ विमाने माघारी घेतली. या मुद्द्यावरून सध्या गहजब सुरू आहे.

ताझिकिस्तानमधील आयनी एअरबेस हा भारताचा भारताबाहेरचा एकमेव मिलिटरी एअरबेस आता अधिकृतरीत्या बंद झाला आहे. या एअरबेसवर भारताची सुखोई सारखी प्रगत लढाऊ विमाने तैनात करण्यात आलेली होती. भारताचे २०० सैनिकही तेथे होते. आता ते माघारी परतले आहेत. ताझिकिस्तान, उझबेकिस्तान, किरगिझस्तान हे सर्व देश मध्य आशिया उपखंडाचा एक भाग आहेत. पूर्वी हे सर्व देश सोव्हिएत रशियाचा भाग होते. १९९०च्या दशकामध्ये सोव्हिएत रशियाचे विघटन झाले आणि एकूण १६ नवे देश स्थापन झाले. ताझिकिस्तान हा यापैकीच एक. या देशाचे सामरिक स्थान अतिशय महत्त्वाचे आहे. याचे कारण या देशाच्या सीमारेषा एकीकडे चीनला, दुसरीकडे रशियाला आणि तिसरीकडे पाकव्याप्त काश्मीरलाही जुळलेल्या आहेत. त्यामुळे भारताची ताझिकिस्तानमध्ये लष्करी उपस्थिती अतिशय महत्त्वाची होती. हे महत्त्व ओळखूनच अयनी एअरबेसमध्ये भारताने आपली तैनाती केली होती.

सोव्हिएत रशियाचे पतन होऊन हे मध्य आशियाई देश विभक्त झाले तेव्हा या देशांची अर्थव्यवस्था अत्यंत डबघाईला आली होती. त्यांच्याकडे मिलिटरी एअरबेसचे व्यवस्थापन करण्याची क्षमता नव्हती. अयनी एअरबेस हा ताझिकिस्तानच्या राजधानीपासून दहा किलोमीटर अंतरावर आहे. हा एअरबेस पूर्वीच्या सोव्हिएत रशियाने विकसित केला होता; पण तो मेंटेन ठेवणे फार अवघड होते. यासाठीचा पैसा ताझिकिस्तानकडे नव्हता. त्यामुळे २००२ मध्ये अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील सरकार केंद्रात सत्तेत असताना संरक्षणमंत्री जॉर्ज फर्नांडिस आणि अजित डोवाल यांच्या महत्त्वपूर्ण योगदानातून भारताने ताझिकिस्तानसोबत करार केला. या कराराच्या माध्यमातून अयनी एअरबेसचा विकास भारत करेल, असे निर्धारित करण्यात आले.

अयनी एअरबेसचे वैशिष्ट्य म्हणजे त्याची ३.२ किलोमीटरची लांबलचक धावपट्टी. या माध्यमातून भारताला एकाचवेळी मध्य आशिया, चीन, अफगाणिस्तान, इराण, पीओके, पाकिस्तान या सर्वांवर नजर ठेवणे शक्य होणार होते. एक महत्त्वाची बाब म्हणजे, मध्य आशिया ही एक मोठी बाजारपेठ आहे; परंतु भारताचा त्याच्याशी थेट कनेक्ट नाही. त्यामुळे मध्य आशियासोबतचा भारताचा ८ ते १० अब्जचा व्यापार हा रस्तेमार्गाने न होता हवाईमार्गाने होतो. त्यामुळेच आपण इराणच्या चाबहार बंदराचे व्यवस्थापनाचे कंत्राट मिळवले आहे. मध्यंतरी अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी यावर निर्बंध आणले होते. त्यामुळे काहीसे चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते; पण नुकतेच ट्रम्प यांनी या बंदराच्या विकासासाठी ६ महिन्यांची मुदत दिली आहे. चाबहारच्या माध्यमातून इराण, अफगाणिस्तान आणि मध्य आशिया अशी रेल्वेलाईन विकसित करण्याचेही भारताचे प्रयत्न सुरू आहेत.



यामागचे उद्दिष्ट म्हणजे मध्य आशियाच्या बाजारपेठेत भारताला अधिकाधिक शिरकाव हवा आहे. मध्य आशिया हा खनिज तेल आणि नैसर्गिक वायूने समृद्ध प्रांत आहे. त्यामुळे हा भाग आपल्यासाठी खूप महत्त्वाचा आहे. मध्य आशियातून भारतामध्ये मोठ्या प्रमाणावर लोक वैद्यकीय उपचारांसाठी येत असतात. भारताची मध्य आशियाला होणारी जेनेरिक औषधांची निर्यातही मोठी आहे. त्यामुळे आर्थिक, व्यापारी आणि सामरिक दृष्टिकोनातून मध्य आशियाशी जोडले जाणे भारतासाठी महत्त्वाचे आहे. विशेषतः पीओकेचे क्षेत्र ताझिकिस्तानशी जोडलेले असल्याने २००२ मध्ये भारताने अयनी एअरबेस विकसित करण्याचा निर्णय घेतला. यासाठी २० वर्षांचा एक करार भारताने ताझिकिस्तानसोबत केला.

या २० वर्षांत १०० दशलक्ष डॉलरची गुंतवणूक केली आणि त्या माध्यमातून हा एअरबेस विकसित केला. हा पैसा भारताच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाकडून खर्च केला गेला. अयनी एअरबेसच्या व्यवस्थापनासंदर्भातील करार २०२२ मध्ये संपुष्टात आला. आता २०२५ मध्ये परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने एका पत्रकाद्वारे भारताने या एअरबेसवरून पूर्णतः बाहेर पडल्याचे जाहीर केले आहे. यामागचे एक कारण म्हणजे ताझिकिस्तानने या कराराला मुदतवाढ देण्यास नकार दिला, हे आहेच शिवाय दुसरे कारण म्हणजे याच्या व्यवस्थापनासाठी प्रचंड प्रमाणात पैसा खर्च करावा लागत होता. याखेरीज एक महत्त्वाची बाब म्हणजे हा करार केला तेव्हाची आणि आताची स्थिती यामध्ये बराच फरक पडलेला आहे. त्यावेळी भारत शांघाय सहकार्य संघटनेचा सदस्य नव्हता; पण २०१७ मध्ये भारत या संघटनेचा सदस्य बनला. त्यामुळे भारताची मध्य आशियातील उपस्थिती आता वाढलेली आहे. तिसरी बाब म्हणजे रशियाचा त्यावेळी ताझिकिस्तानात एकही एअरबेस नव्हता; मात्र रशियाने ताझिकिस्तानमध्ये एक मोठा एअरबेस विकसित केला आहे. त्यामुळे रशियाची तेथील उपस्थिती वाढलेली आहे.

रशिया हा भारताचा खंदा समर्थक असणारा आणि पारंपरिक मित्र देश आहे. त्यामुळे एकाच भागात दोन मित्रदेशांचे समांतर एअरबेस असणे संयुक्तिक ठरणारे नाही, हाही एक मुद्दा भारताने या एअरबेसवरून माघार घेण्यामागे असू शकतो. तसेच चीनचीही यामध्ये भूमिका असू शकते. कारण, चीनला युरोपशी जोडले जाण्यासाठी ताझिकिस्तानवरील नियंत्रण गरजेचे आहे. तथापि, मध्य आशियाई देशांसोबत भारताचे कलेक्टिव्ह स्ट्रक्चर तयार होण्याच्या शक्यता आहेत. त्यामुळे अयनीची पूर्वीइतकी गरज भारताला राहिलेली नाही. असे असले, तरी भारताची येथून एक्झिट झाल्यानंतर निर्माण झालेली पोकळी चीन किंवा रशियाकडून भरून काढली जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. अयनी एअरबेस बंद झालेला असला, तरी मध्य आशियाई देशांसोबत भारताचे आर्थिक, व्यापारी संबंध घनिष्ठ बनलेले आहेत. तसेच भारत आणि मध्य आशियाचे सांस्कृतिक आणि ऐतिहासिक बंधही घट्ट आहेत. भारत या देशांना केवळ शस्त्रसाम्रगीचा पुरवठाच नव्हे, तर लष्करी प्रशिक्षणही देत आहे. तसेच तेथे मोठ्या प्रमाणावर विकास प्रकल्पही राबवत आहे. त्यामुळे मिलिटरी बेस बंद झाल्याने या देशांवरचा भारताचा प्रभाव कमी झाला, असे आजिबात म्हणता येणार नाही. भारत-मध्य आशियाचे ऐतिहासिक, सांस्कृतिक, राजनैतिक आणि आर्थिक व व्यापारी संबंध येत्या काळातही अधिकाधिक घनिष्ठ होत जाणार आहेत.

# सुक्या मेव्यामधील 'हा' एक पदार्थ आहे हाडांवर रामबाण उपाय, म्हातारपणातही हाडे राहतील मजबूत असे करा सेवन

सुकामेवा हा आरोग्यासाठी फायदेशीर मानला जातो. असं असलं तरी काही पदार्थ तुमची हाडे आतून मजबूत करू शकतात हेही खरं आहे. असाच एक पदार्थ म्हणजे काळे मनुके. हे दिसतात तर एवढेसे पण यांचे फायदे आभाळाएवढे आहेत. काळे मनुके एक गोड आणि पोषक तत्वांनी समृद्ध सुपरफूड आहे. यामध्ये असलेले कॅल्शियम, बोरॉन, मॅग्नेशियम आणि अँटीऑक्सिडंट्स तुमची हाडे मजबूत करण्यास, सांध्यांची लवचिकता राखण्यास आणि तुमचे शरीर उतार वयात सक्रिय ठेवण्यास मदत करतात.

पुढच्या जेव्हा पण तुम्हाला गोड पदार्थाची इच्छा असेल तेव्हा मूठभर काळे मनुके खा. त्याची चव चांगली तर असतेच शिवाय तुमची हाडे निरोगी आणि मजबूत राहतात. तर मग एवढ्याशा मनुक्यांनी तुमच्या हाडांची मजबूती कशी राखली जाते याबाबत सविस्तर जाणून घेऊ

हाडांचे आरोग्य का महत्त्वाचे आहे? आपली हाडे केवळ आपल्या शरीरालाच आधार देत नाहीत, तर आपल्या अवयवांचे संरक्षणदेखील करतात. ती कॅल्शियमसारखी आवश्यक खनिजे साठवतात आणि आणि शरीराला हालचाल करण्याची शक्ती देतात. असं असताना वयानुसार त्यातही वयाच्या तिशीनंतर हाडांची ताकद कमी होऊ लागते. रजोनिवृत्तीनंतर महिलांमध्ये ही समस्या वाढते, कारण कॅल्शियमची पातळी कमी होते. म्हणून तुमच्या आहारात असे पदार्थ समाविष्ट करणे गरजेचे आहे, जे तुमची हाडे आतून मजबूत



करतात आणि काळे मनुके यासाठी सर्वोत्तम उपाय आहेत.

काळे मनुके हाडांसाठी का फायदेशीर? काळे मनुके हाडांच्या आरोग्यासाठी आवश्यक असलेल्या पोषक तत्वांनी समृद्ध असतात. त्यात आढळणारे बोरॉन नावाचे खनिज हाडांच्या वाढीस आणि देखभालीत महत्त्वाची भूमिका बजावते. एक छोट्या मूठभर म्हणजे सुमारे ३० ग्रॅम काळ्या मनुक्यांमध्ये कॅल्शियम, बोरॉन, पोटॅशियम, मॅग्नेशियमस लोह, तांबे आणि अँटीऑक्सिडंट्स असतात. हे पोषक घटक काळ्या मनुक्यांना हाडे आणि सांध्यासाठीचा रामबाण उपाय ठरवतात.

काळ्या मनुक्यांमध्ये असलेले कॅल्शियम हाडे मजबूत करते आणि त्यांना कमकुवत होण्यापासून रोखते. बोरॉन शरीराला कॅल्शियम चांगल्या प्रकारे शोषण्यास मदत करते, त्यामुळे हाडांची घनता टिकते. पोटॅशियम शरीरातील आम्लता कमी करते, कारण जास्त आम्लता हाडांमधून कॅल्शियम बाहेर काढू शकते. मॅग्नेशियम कॅल्शियमसोबत काम करून हाडांची रचना मजबूत करते. शिवाय लोह आणि तांबे कोलॅजन तयार करण्यास मदत करतात. प्रथिने सांधे लवचिक आणि निरोगी ठेवतात. काळ्या मनुक्यांमधील अँटीऑक्सिडंट्स हाडांना जळजळ आणि नुकसानापासून वाचवतात, त्यामुळे ते जास्त काळ मजबूत आणि सक्रिय राहतात.

काळ्या मनुक्याचे फायदे काळ्या मनुक्यात कॅल्शियम भरपूर प्रमाणात असते. ते हाडांची ताकद राखते आणि वयानुसार त्यांना कमकुवत होण्यापासून रोखते.

बोरॉन नावाचे खनिज शरीराला कॅल्शियम आणि मॅग्नेशियम योग्यरित्या शोषण्यास मदत करते आणि हाडांचे क्षय रोखते.

काळ्या मनुक्यामध्ये असलेले तांबे आणि लोह कोलॅजन तयार करतात, त्यामुळे हाडे लवचिक राहतात आणि सांधेदुखी कमी होते.

काळ्या मनुक्यात असलेले रेझवेराट्रोल आणि फ्लेव्होनॉइड्स सारखे अँटीऑक्सिडंट्स हाडांना जळजळ आणि तणावापासून वाचवतात.

पोटॅशियम आणि मग्नेशियम शरीराच्या पीएच पातळीला संतुलित करतात आणि कॅल्शियमचे नुकसान टाळतात. त्यामुळे हाडे मजबूत राहतात.

लहान मुलांना खोकला झाला असल्यास लोखंडी तव्यावर ७ ते ८ काळे मनुके थोडेसे गरम करून रोज सकाळी खायला द्यावे. याने खोकल्याला आराम मिळतो.

काळ्या मनुक्याचे सेवन कसे करावे?

नाश्त्यामध्ये दररोज ८ ते १० काळे मनुके समाविष्ट करा

रात्रभर पाण्यात भिजवून सकाळी रिकाम्या पोटी खाणे अधिक फायदेशीर आहे

काळे मनुके ओट्स, दही, स्मूदी किंला सॅलडमध्ये देखील घालू शकता.

चव वाढवण्यासाठी आणि आरोग्यासाठी फायदे मिळवण्यासाठी मिष्टान्नांमध्ये साखरेऐवजी मनुक्यांचा वापर करा.

# डुकराच्या मूत्रपिंडाचे मानवामध्ये प्रत्यारोपण! वैद्यकशास्त्रात नवे पर्व

मुंबई : मानवी अवयवांच्या कमतरतेवर तोडगा काढण्यासाठी वैज्ञानिकांनी केलेल्या प्रयत्नांना मोठे यश मिळाले आहे. अमेरिकेतील एनवाययू लँगोन हेल्थ येथील डॉक्टरांनी एका रुग्णामध्ये डुकराचे जनुक-संपादित मूत्रपिंड यशस्वीपणे प्रत्यारोपित केले आहे.ही जगातील पहिली क्लिनिकल ट्रायल असून, डुकराच्या मूत्रपिंडाचे मानवामध्ये प्रत्यारोपण प्रत्यक्षात कितपत यशस्वी ठरते, याची चाचणी आता अधिकृतपणे सुरू झाली आहे. हे मूत्रपिंड युनायटेड थेरप्युटिक्स या जैव-तंत्रज्ञान कंपनीने तयार केले आहे. अमेरिकेत सुमारे एक लाख लोक मूत्रपिंड प्रत्यारोपणाच्या प्रतिक्षेत असून भारतात हीच संख्या दुपटीहून अधिक आहे.

या अभ्यासातील पहिल्या रुग्णाची ओळख गुप्त ठेवण्यात आली असून, शस्त्रक्रिया नेमकी कधी झाली याबाबतची माहितीही सध्या उघड केलेली नाही. तथापि या प्रकल्पाचे प्रमुख डॉ. रॉबर्ट मोंटगोमेरी यांनी सांगितले की, या छोट्या चाचणीत सुरुवातीला सहा रुग्णांचा समावेश होईल आणि सर्व काही सुरळीत झाल्यास ती वाढवून ५० पर्यंत नेली जाऊ शकते.अमेरिकेच्या अन्न व औषध प्रशासनाने कठोर देखरेखीखाली या चाचणीस मान्यता दिली आहे. यापूर्वी 'कंपॅशनेट यूज' प्रयोगांत काही मर्यादित यश मिळाले होते. एका अलाबामातील महिलेमध्ये डुकराचे मूत्रपिंड १३० दिवस कार्यरत राहिले, तर मॅसॅच्युसेट्स येथील एका रुग्णामध्ये ते तब्बल २७१ दिवस कार्यरत होते.

दरम्यान, अमेरिकेत सध्या एक लाखाहून अधिक रुग्णांना मूत्रपिंड प्रत्यारोपणाची गरज आहे, आणि हजारो रुग्ण प्रतीक्षेतच मृत्यूमुखी पडतात. या पार्श्वभूमीवर डुकराच्या अवयवांचा पर्याय म्हणून जनुक संपादन ही क्रांतिकारक संकल्पना उभी राहत आहे.या प्रयोगात वापरलेले मूत्रपिंड एकूण १० जनुक-संपादनांद्वारे तयार करण्यात आले आहे.त्यात डुकरातील प्रतिकारशक्तीला उद्दीपित करणारी जनुके निष्क्रिय केली आहेत, तसेच काही मानवी जनुके जोडून सुसंगतता वाढवली आहे.डॉ मोंटगोमेरी म्हणाले, प्रत्येक रुग्णाच्या अनुभवातून आम्ही शिकत आहोत. डायलिसिसचा पर्याय उपलब्ध असल्यामुळे जोखीम नियंत्रित ठेवता येते.



ही दिशा योग्य दिशेने पुढे जात आहे.या प्रयोगांनी मानवी अवयवदानाच्या तुटवड्यावर मोठा उपाय मिळण्याची आशा पुन्हा एकदा जागवली आहे.

आधीच्या प्रयोगांनीच दिला पाया मानवातील मूत्रपिंडांच्या तुटवड्याला पर्याय शोधण्याच्या प्रयत्नांना आता खऱ्या अर्थाने दिशा मिळाली असली, तरी या नव्या क्लिनिकल चाचणीमागे गेल्या काही वर्षांतील शास्त्रज्ञांच्या सातत्यपूर्ण प्रयोगांचा भक्कम पाया आहे. डुकराचे जनुक-संपादित मूत्रपिंड मानवामध्ये प्रत्यारोपित करण्याचे अनेक प्रयोग २०२१ ते २०२४ या काळात अमेरिकेत झाले. त्यातून मिळालेल्या निष्कर्षांवरच सध्याची अधिकृत चाचणी उभी आहे.सन २०२१ मध्ये न्यूयॉर्कमधील एनवाययू लँगोन हेल्थ येथील शल्यविशारद डॉ. रॉबर्ट मोंटगोमेरी यांच्या टीमने पहिला ऐतिहासिक प्रयत्न केला. मेंदूमृत रुग्णावर डुकराचे जनुक-संपादित मूत्रपिंड जोडण्यात आले आणि ते ५४ तास कार्यरत राहिले.या प्रयोगाने 'मानवाच्या शरीरात डुकराचा अवयव कार्य करू शकतो' हे प्रथमच सिद्ध केले. यानंतर २०२२ मध्ये अलाबामा विद्यापीठातील संशोधकांनी 'जिम पार्सन्स मॉडेल' अंतर्गत मेंदूमृत रुग्णामध्ये दोन डुक्करांची मूत्रपिंडे प्रत्यारोपित केली. ती सुमारे ७२ तास मूत्र तयार करत राहिली. या प्रयोगामुळे शल्यक्रियेची सुरक्षितता आणि प्रक्रियेची शास्त्रीय अचूकता अधिक स्पष्ट झाली.

२०२४ मध्ये बोस्टनमधील मॅसॅच्युसेट्स जनरल हॉस्पिटलने नवा विक्रम केला. ६२ वर्षीय मूत्रपिंड निकामी रुग्णावर प्रत्यक्ष प्रत्यारोपण करण्यात आले. डुकराचे मूत्रपिंड तब्बल २७१ दिवस कार्यरत राहिले, हा आतापर्यंतचा सर्वाधिक कालावधीचा यशस्वी निकाल ठरला. अखेरीस संसर्गामुळे रुग्णाचा मृत्यू झाला. मात्र शास्त्रज्ञांच्या मते हा प्रयोग भविष्यासाठी मोठा टप्पा होता.याच काळात २०२३ मध्ये एनवाययू लँगोनमध्ये दुसरा 'कंपॅशनेट यूज' प्रयोग झाला.गंभीर किडनी फेल्युअर असलेल्या एका रुग्णामध्ये डुकराचे मूत्रपिंड प्रत्यारोपित करण्यात आले आणि ते तब्बल १३० दिवस चालू राहिले. शरीराने विशेष नकारात्मक प्रतिक्रिया दाखवली नाही. या अनुभवावरच आता अधिकृत क्लिनिकल ट्रायलची पायाभरणी झाली आहे.


या सर्व प्रयोगांमध्ये वापरलेल्या मूत्रपिंडांमध्ये १० जनुक संपादनांद्वारे बदल करण्यात आले.डुकरातील प्रतिकारशक्ती उद्दीपित करणारी जनुके निष्क्रिय करण्यात आली, तर काही मानवी जनुके जोडून सुसंगती वाढवली गेली.या तंत्रज्ञानामुळे प्रत्यारोपणानंतर शरीरातील नकारात्मक प्रतिक्रिया मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे. या सर्व प्रयोगांच्या यशामुळे २०२५ मध्ये आता सुरू झालेली पहिली अधिकृत क्लिनिकल ट्रायल वैद्यकशास्त्रात नव्या पर्वाची सुरुवात मानली जात आहे.

## मानसिक आरोग्य प्राधिकरणे कागदावरच सक्रिय! कायद्याला आठ वर्षे उलटली तरी अनेक राज्यांत अजूनही अपूर्ण रचना

मुंबई : देशात मानसिक आरोग्यविषयक जागरूकता वाढवण्याचे प्रयत्न मागील काही वर्षांत सुरू असले तरी, या क्षेत्रातील सर्वात महत्त्वाचा पाया असलेल्या राज्य मानसिक आरोग्य प्राधिकरणांची कामगिरी मात्र अत्यंत मर्यादित राहिली आहे. २०१७ साली लागू झालेल्या मानसिक आरोग्य कायद्यानुसार सर्व राज्यांनी स्वतंत्र प्राधिकरणे, निरीक्षण मंडळे आणि उपचार केंद्रांची नोंदणी व्यवस्था उभारायची होती. मात्र आठ वर्षांनंतरही बहुतांश राज्यांत ही यंत्रणा केवळ कागदावरच कार्यरत असल्याचे स्पष्ट होत आहे. आरोग्य मंत्रालयाच्या ताज्या आकडेवारीनुसार, देशातील २८ राज्यांपैकी सुमारे निम्म्या राज्यांनीच आपली मानसिक आरोग्य पुनरावलोकन मंडळे (मेंटल हेल्थ रिव्ह्यू बोर्ड्स) कार्यान्वित केली आहेत. काही राज्यांत अध्यक्ष व सदस्यांची नियुक्ती प्रलंबित असून, काहींकडे कार्यालयीन व प्रशासकीय साधनसामग्रीच नाही. परिणामी, मानसिक आजारग्रस्त नागरिकांना कायद्यानुसार मिळणाऱ्या हक्कांची अंमलबजावणी कागदावरच अडकली आहे.सुप्रीम कोर्टाने नुकतेच या संदर्भातील एका याचिकेची सुनावणी करत राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाला थेट देखरेखीचे निर्देश दिले. मानसिक आरोग्य कायद्याची अंमलबजावणी झाल्याचे सांगणे पुरेसे नसून प्रत्यक्षात त्या यंत्रणा नागरिकांपर्यंत पोहोचल्या पाहिजेत, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. मानसिक आरोग्य सेवा पुरवण्यासाठी आवश्यक तज्ज्ञांची टंचाईही गंभीर आहे. देशात केवळ ०.७५ मानसोपचारतज्ज्ञ प्रति एक लाख लोकसंख्या एवढे प्रमाण असून, जागतिक आरोग्य संघटनेच्या शिफारसीपेक्षा हे प्रमाण निम्म्याहूनही कमी आहे. मनोवैज्ञानिक, सामाजिक कार्यकर्ते, आणि प्रशिक्षित काउन्सिलर या सर्वांचा तुटवडा सर्वच राज्यांमध्ये जाणवतो.मानसिक आरोग्यासाठी केंद्र सरकारकडून मिळणाऱ्या अर्थसहाय्याचाही हिस्सा अत्यल्प आहे. २०२४-२५ च्या अर्थसंकल्पात एकूण आरोग्य खर्चातील केवळ ०.३ टक्के निधी मानसिक आरोग्यासाठी राखीव ठेवण्यात आला.'जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रम' सध्या ७६७ जिल्ह्यांपर्यंत पोहोचला असला तरी, ग्रामीण भागातील सेवा अपुऱ्या आहेत. टेली मानस या दूरध्वनी मार्गे समुपदेशन देणाऱ्या योजनेने थोडा दिलासा दिला असला तरी प्रत्यक्ष उपचार, पुनर्वसन आणि सामाजिक पुनर्स्थापना यांसारख्या बाबतीत मोठी तफावत कायम आहे. २०१७ साली लागू झालेल्या मानसिक आरोग्य कायद्यांतर्गत प्रत्येक राज्याने मानसिक आरोग्य रुग्णालयांची नोंदणी, अधिकारांचे संरक्षण आणि पुनरावलोकन मंडळांची स्थापना करण्याची जबाबदारी घेतली. या कायद्यानुसार मानसिक आजार हा आरोग्याचा अविभाज्य भाग मानला जातो आणि त्यासाठी विमा संरक्षणही अनिवार्य करण्यात आले. मात्र प्रत्यक्षात, बहुतांश राज्यांत या तरतुदींची अंमलबजावणी विलंबित राहिली आहे. मानसिक आरोग्यविषयक कायदे आणि योजना तयार झाल्या असल्या तरी, प्राधिकरणांचे कामकाज नागरिकांना दिसत नाही. उपचारकेंद्रांची नोंदणी, तक्रार निवारण मंडळे किंवा निरीक्षण पथक यांची कार्यक्षमता जवळपास शून्य असल्याचे मानसोपचारतज्ज्ञांचे म्हणणे आहे.प्राधिकरणांची उपस्थिती कागदावर असून ती प्रत्यक्षात नागरिकांपर्यंत पोहोच नाही असेही तज्ज्ञांचे मत आहे. अनेक राज्यांनी प्राधिकरणे केवळ दाखवण्यासाठी स्थापन केली असून प्रत्यक्षात त्यांच्याकडे मनुष्यबळ, बजेट किंवा अधिकार नसल्याने नागरिकांना अपेक्षित मदत मिळत नाही. परिणामी मानसिक आरोग्य हे 'अदृश्य संकट' बनलेले असतानाच देशातील प्राधिकरणांची निष्क्रियता ही काळजी वाढवणारी बाब आहे. केंद्र आणि राज्य सरकारांनी या संस्थांना केवळ कागदी अस्तित्व न ठेवता प्रत्यक्ष कामकाजात आणणे हेच आता सर्वात मोठे आव्हान ठरत आहे. अलीकडेच म्हणजे २८ ऑक्टोबर रोजी सर्वोच्च न्यायालयाने एका खटल्याच्या अनुषंगाने याबाबत महत्वपूर्ण निर्णय दिला आहे.उत्तर प्रदेशातील बदायूं येथील 'श्रद्धा-आधारित' आश्रमात साखळदंडात बांधलेल्या मानसिक आजारी कैद्यांच्या अवस्थेवर आधारित याचिकेच्या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने हा आदेश दिला आहे. देशभरातील केंद्रीय आणि राज्य मानसिक आरोग्य प्राधिकरणांचे योग्य कार्य आणि देखरेख सुनिश्चित करण्याची मागणी करणारी याचिका राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाकडे हस्तांतरित केली. न्यायमूर्ती पी. एस. नरसिंहा यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने हा आदेश दिला.ही याचिका २०१८ मध्ये अधिवक्ता गौरव कुमार बन्सल यांनी दाखल केली होती. त्यांनी उत्तर प्रदेशातील बदायूं येथील एका 'श्रद्धा-आधारित' आश्रमात साखळदंडात बांधलेल्या मानसिक आजारी कैद्यांची दयनीय अवस्था न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली होती. त्यावेळी बन्सल यांनी २०१७ च्या मानसिक आरोग्य कायद्याच्या तरतुदीनुसार मानसिक आजाराने ग्रस्त व्यक्तींच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी स्वतंत्र केंद्रीय आणि राज्य मानसिक आरोग्य प्राधिकरणांची स्थापना करण्याची मागणी केली होती. तसेच या प्राधिकरणांसाठी आणि मानसिक आरोग्य पुनरावलोकन मंडळांसाठी स्वतंत्र निधीची तरतूद करण्याचीही मागणी केली होती. आरोग्य मंत्रालयाने नंतर न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल करून या प्राधिकरणांची अधिसूचना जारी झाल्याचे सांगितले. न्यायालयाने निरीक्षण केले की 'केंद्रीय मानसिक आरोग्य प्राधिकरण तसेच राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांनी स्थापन केलेली प्राधिकरणे कार्यरत असल्यामुळे न्यायाच्या हितासाठी या याचिकेवर एनएचआरसीने देखरेख ठेवावी आणि या प्राधिकरणांचे म्हणणे ऐकल्यानंतर आवश्यक दिशानिर्देश द्यावेत' असा सर्वोच्च न्यायालयाचा आदेश आहे. न्यायालयाने या याचिकेला एनएचआरसीकडे 'तक्रार' म्हणून पुनर्नंबरित करून कायद्यानुसार देखरेख आणि निकाली काढण्यासाठी पाठवण्याचे निर्देश दिले. तसेच या प्राधिकरणांनी प्रभावीपणे कार्य करावे यासाठी आवश्यक आदेश जारी करण्याचे निर्देश एनएचआरसीला दिले.

## हायपोथायरॉईडीझमसाठी 'हे' आयुर्वेदिक उपाय ठरतील फायदेशीर, जाणून घ्या सोप्या पद्धती

बहुतेकांमध्ये सध्या बिघडलेली जीवनशैली आणि असंतुलित आहार यामुळे थायरॉईडचा त्रास बळावलेला दिसतो. जेव्हा आपल्या थायरॉईड ग्रंथी पुरेसे हार्मोन्स तयार करत नाहीत, तेव्हा हायपोथायरॉईडीझम होतो. त्यामुळे आपले चयापचय मंदावते. शिवाय थकवा, वजन वाढणे, थंडी वाजणे, केस गळणे आणि मूड बदलणे अशी लक्षणे दिसतात. आयुर्वेद या स्थितीचा संबंध कमकुवत पचनसंस्थेशी असल्याचे सांगते. या परिस्थितीसाठी काही नैसर्गिक आणि आयुर्वेदिक उपाय खूप फायदेशीर ठरू शकतात.



अश्वगंधाचा वापर अश्वगंधा ही एक शक्तिशाली औषधी वनस्पती आहे, जी थायरॉईड हार्मोन्सना संतुलित करते आणि तणावासाठी कारणीभूत हार्मोन कॉर्टिसोल कमी करते. दररोज अर्धा चमचा अश्वगंधा पावडर कोमट दुधासोबत घेतल्याने ग्रंथी मजबूत होतात. त्रिफळा पावडर शरीरातील विषारी पदार्थ काढून टाकून पचनक्रिया सुधारते आणि लिव्हरला विषमुक्त करते, त्यामुळे हार्मोन्स तयार होण्यास मदत होते. झोपण्यापूर्वी कोमट पाण्यासोबत ते घेणे अत्यंत फायदेशीर आहे. कंचनार, आलं आणि लसूण कंचनार गुग्गुळू हे थायरॉईडमधील जळजळ आणि आळस कमी करते आणि कफ, फॅटचे प्रमाण कमी करते. आल्यामध्ये पाचन उत्तेजक आणि दाहक विरोधी गुणधर्म असतात, ते थायरॉईडमध्ये रक्त प्रवाह वाढवतात आणि चयापचय सक्रिय ठेवतात. लसूण थायरॉईड एन्झाइम्स सक्रिय करते आणि शरीरातील विषारी पदार्थ काढून टाकण्याची प्रक्रिया वेगवान करते. सकाळी रिकाम्या पोटी कोमट पाण्यासोबत लसणाच्या २ ते ३ पाकळ्या खाणे फायदेशीर आहे. मेथीचे दाणे आणि तुळस मेथीचे दाणे हार्मोन्स आणि रक्तातील साखर संतुलित करतात, लिंबू पाणी शरीराला विषमुक्त करते आणि वात-कफ दोष संतुलित करते. नारळाच्या तेलातील मध्यम साखळी फॅटी ॲसिड थायरॉईडला उत्तेजित करतात आणि ऊर्जा वाढवतात. तुळस आणि दालचिनी एकत्रितपणे कॉर्टिसोल कमी करतात आणि चयापचय वाढवतात. योग योग आणि प्राणायम अत्यंत महत्त्वाचे आहेत. सूर्यनमस्कार घशामधील रक्तप्रवाह वाढवतात, तसंच भ्रामरी, उज्जयी आणि अनुलोम-विलोम प्राणायम ग्रंथींना सक्रिय करतात. नियमित सरावाने थायरॉईड संतुलित होते, शरीराची ऊर्जा वाढते आणि मन शांत होते. या उपायांमुळे हायपोथायरॉईडीझमशी संबंधित लक्षणे हळूहळू सुधारू शकतात, मात्र कोणतेही आयुर्वेदिक औषध किंवा उपचार घेण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घेणे महत्त्वाचे आहे.

## जेवणाआधी किंवा जेवणानंतर डायबिटीज राहील नॉर्मल, फक्त दुपारच्या आणि रात्रीच्या जेवणात 'या' भाज्यांचा आवर्जून करा समावेश

मधुमेह हा एक चयापचय रोग आहे, त्यामध्ये शरीरात ग्लुकोज किंवा साखरेची पातळी असामान्यपणे वाढते. जेव्हा शरीर पुरेशा प्रमाणात इन्सुलिन हार्मोन तयार करू शकत नाही किंवा उन्सुलिनचा योग्य वापर करू शकत नाही. त्यावेळी रकतातील साखर वाढू लागते. चुकीच्या खाण्याच्या सवयी, ताणतणाव, लठ्ठपणा, शारीरिक निष्क्रियता आणि अनुवांशिक कारणे या आजाराला आणखी वाढवतात. जर रक्तातील साखर नियंत्रित केली नाही, तर हृदयरोग, किडनी निकामी होणे, दृष्टी कमी होणे आणि मज्ञातंतूंचे नुकसान असे गंभीर परिणाम होऊ शकतात. मात्र चांगली बातमी अशी आहे की, संतुलित आहार घेतल्याने आणि काही विशिष्ट भाज्या खाल्ल्याने उपवासापासून ते जेवणानंतर साखरेची पातळी सामान्य राहते.




डायबिटीज तज्ज्ञ आणि फिटनेस तज्ज्ञ डॉ. अनुपम घोष यांनी याबाबत बोलताना सांगितले की, डायबिटीज नियंत्रित करण्यासाठी सर्वात महत्त्वपूर्ण गोष्ट म्हणजे फायबरयुक्त, कमी ग्लायसेमिक इंडेक्स असलेल्या भाज्या खाणे. पालक, ब्रोकोली, शिमला मिरची, सोयाबीन आणि फ्लॉवर यासारख्या काबी भाज्या केवळ रक्तातील साखर नियंत्रित करत नाहीत, तर इन्सुलिन उत्पादन देखील सुधारतात. त्यामुळे शरीर आतून निरोगी राहते. डायबिटीज नियंत्रित करण्यासाठी कोणत्या भाज्या खाल्ल्या पाहिजेत हे जाणून घेऊ

पालक पालक डायबिटीज रूग्णांसाठी अत्यंत फायदेशीर आहे. त्यात कार्बोहायड्रेट्स कमी असतात आणि फायबर, मॅग्नेशियम आणि पोटॅशियम भरपूर प्रमाणात असते. हे तीन पोषक तत्व रक्तातील साखरेचे प्रमाण सामान्य ठेवण्यासाठी खूप महत्त्वाचे ठरते. पालकमधील अल्फा-लिपोइक ॲसिड इन्सुलिन संवेदनशीलता सुधारते. फॅथम जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या संशोधनानुसार, पालकमध्ये आढळणारे नायट्रेट कंपाउंड इन्सुलिनची कार्यक्षमता वाढवण्यास मदत करते. पालकाचा समावेश सॅलड, स्मूदी किंवा फ्राईजच्या माध्यमातून करू शकता. ब्रोकोली ब्रोकोली ही साखर नियंत्रणासाठी एक उत्तम भाजी आहे. त्यात सल्फोराफेन नावाचे संयुग असते, ते जळजळ कमी करण्यास आणि इन्सुलिनची क्रिया सुधारण्यास मदत करते. सायन्स डायरेक्टमध्ये प्रकाशित झालेल्या संशोधनानुसार, ब्रोकोलीचे सेवन हायपरग्लाइसेमिया, इन्सुलिन प्रतिरोध आणि ऑक्सिडेटिव्ह ताण कमी करू शकते. त्यात फायबर, व्हिटॅमिन सी आणि के भरपूर प्रमाणात असते, ते रक्तातील साखर आणि रोगप्रतिकारक शक्ती दोन्हीला फायदेशीर ठरते.

शिमला मिरची रंगीबेरंगी आणि कुरकुरीत शिमला मिरची केवळ चविष्टच नाही, तर आरोग्यासाठीसुद्धा फायदेशीर आहे. त्यामध्ये कॅलरीज आणि कार्बोहायड्रेट्स कमी असतात आणि व्हिटॅमिन सी, बीटा-कॅरोटीन आणि फ्लेव्होनॉइड्स सारख्या अँटीऑक्सिडंट्सने समृद्ध असतात. राष्ट्रीय आरोग्य संस्थेने केलेल्या अभ्यासात असे दिसून आले की, लाल शिमला मिरचीच्या अर्कामध्ये डायबिटीजविरोधी गुणधर्म असतात, जे शरीरातील रक्तातील साखरेची पातळी संतुलित करण्यास मदत करतात. ते सॅलड, सूप किंवा ग्रील्ड भाज्यांच्या स्वरूपात खाता येईल.

सोयाबीन डायबिटीजसाठी सोयाबीन हे पचण्यास हलके आणि प्रभावी आहे. यामध्ये कॅलरीज आणि कार्बोहायड्रेट्स कमी असतात आणि फायबर तसंच व्हिटॅमिन ए भरपूर प्रमाणात असते. रिसर्च गेटमध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासानुसार, सोयाबीनमधीन फायबर आणि एन्झाइम्स टाइप-२ डायबिटीज नियंत्रित करण्यास मदत करू शकतात. ते उकडून सॅलड किंवा सूपमध्ये घालता येतात. फ्लॉवर फ्लॉवरमधील व्हिटॅमिन सी, फोलेट आणि अंटीऑक्सिडंट्स शरीरातील जळजळ आणि ऑक्सिडेटिव्ह ताण कमी करतात. हे दोन्ही घटक रक्तातील साखरेची पातळी सामान्य करतात. फ्लॉवरसारख्या क्रूसिफेरस भाज्या नैसर्गिक डायबिटीजविरोधी प्रभाव दाखवतात. फ्राईज, सूप किंवा सॅलड स्वरूपात नियमितपणे याचा आहारात समावेश करू शकता.

# निलंगा नगरपरिषद निवडणुकीकरिता ट्वेन्टी वन शुगरचे व्हा.चेअरमन विजय देशमुख यांची निरीक्षकपदी निवड

लातूर / प्रतिनिधी :– नगर परिषद व नगर पंचायत निवडणूकीच्या निवडणूक आयोगाने केलेल्या घोषणेनंतर सर्वच राजकिय पक्षांनी मतदार संघातील मतदारांचा कानोसा,इच्छुक उमेदवार चाचपणी,इच्छुक उमेदवारांचे उमेदवारी मागणी अर्ज स्वीकारणे, मुलाखती सुरू केल्या असून याकरिता प्रदेश काँग्रेस कडून निरीक्षकांच्या निवडी करण्यात आलेल्या आहेत. लातूर जिल्ह्यातील निलंगा नगरपरिषद निवडणुकी करिता काँग्रेस पक्षाचे प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ,राज्याचे माजी मंत्री दिलीपराव देशमुख, राज्याचे माजी मंत्री,स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक विभागीय प्रभारी आ.अमित विलासराव देशमुख,खा.डॉ.शिवाजी काळगे, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष धीरज विलासराव देशमुख व प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष तथा जिल्हा प्रभारी बाळासाहेब देशमुख यांच्या सूचनेनुसार लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने ट्वेन्टी वन शुगर्सचे व्हा.चेअरमन विजय देशमुख यांची जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांनी निलंगा नगर परिषद निवडणुकीसाठी निरीक्षक म्हणून निवड केली आहे. लातूर जिल्हा काँग्रेस पक्षाच्या वतीने प्रसिद्ध करण्यात आलेल्या प्रसिद्धी पत्रकारनुसार,निलंगा नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही नियुक्ती करण्यात आली असून,या निर्णयामुळे निवडणुकीच्या प्रक्रियेवर बारकाईने लक्ष ठेवले जाणार आहे. विजय देशमुख यांच्या या निवडीमुळे ते पक्षातील सर्वांना सोबत घेऊन निलंगा नगर परिषदेवर काँग्रेसचा झेंडा फडकावणार असा विश्वास अभय साळुंके यांनी व्यक्त केला आहे. नगर परिषद निवडणूक काळात ट्वेन्टी वन शुगर्स चे व्हा. चेअरमन विजय देशमुख यांचा व्यवस्थापन क्षमता अनुभव ,जनसंपर्क निवडणुकीच्या कामकाजात उपयुक्त ठरू शकतो.त्यांच्या नियुक्तीमुळे निवडणुकीच्या प्रक्रियेला अधिक पारदर्शकता आणि निष्पक्षता लाभेल अशी अपेक्षा देखील व्यक्त केली जात असून निवडणुकीच्या दृष्टीने ही एक महत्त्वपूर्ण निवड मानली जात आहे.



## विभाग कार्यालयात विभाग अधिकारी गायब, नागरिक रांगेत उभे, अधिकारी मात्र बेपत्ता..! – वीरेंद्र लगाडे (रिपब्लिकन सेना)





नवी मुंबई / के. एच. हनवते :– नवी मुंबई महानगरपालिकेच्या नेरुळ बी विभाग कार्यालयात विभाग अधिकारी वेळेत येत नाहीत, त्यामुळे तक्रारदार नागरिक तासनतास रांगेत उभे राहतात, पण जबाबदार अधिकारी मात्र कुठेच दिसत नाहीत..!, विभाग अधिकारी येतात पाच नंतर हा बे शिस्त कारभार बंद झाला पाहिजे..!! ईटीसी आणि नेरुळ असे दोन चार्ज एका अधिकाऱ्याला देऊन प्रशासनाने नागरिकांचा छळच सुरू ठेवला आहे. दोन ठिकाणी जबाबदारी देऊन मनपा प्रशासन कोणता कारभार चालवतंय असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत, बी विभाग कार्यालयाकडे सरळ दुर्लक्ष केलं जातंय, आणि त्याचा फटका सामान्य जनतेला बसतोय. हे असंच चालू राहिलं तर तक्रारदार आणि स्थानिक नागरिकांच्या वतीने तीव्र आंदोलन केले जाईल असा इशाराच जनतेचा बुलंद आवाज वीरेंद्र लगाडे रिपब्लिकन सेना नवी मुंबई जिल्हाध्यक्ष यांनी प्रसार माध्यमातून दिला आहे. या संदर्भात तातडीने (नमुमपा) आयुक्तांनी विभागात नवीन, नियमित अधिकारी नेमले नाहीत तर बी विभाग कार्यालयावर तीव्र आंदोलन केले जाईल असा इशाराच दिला आहे.

# औसा नगर परिषद निवडणुकीकरिता काँग्रेसकडून पक्ष निरीक्षक म्हणून ॲड.समद पटेल यांची नियुक्ती

औसा / प्रतिनिधी :– काँग्रेस पक्षाकडून आगामी लातूर जिल्ह्यातील औसा नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीकरिता काँग्रेस पक्षाचे प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ,राज्याचे माजी मंत्री दिलीपराव देशमुख,राज्याचे माजी मंत्री आ.अमित विलासराव देशमुख,खा.डॉ.शिवाजी काळगे,जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष धीरज विलासराव देशमुख तसेच प्रदेश उपाध्यक्ष तथा लातूर जिल्ह्याचे प्रभारी बाळासाहेब देशमुख यांच्या सूचनेनुसार काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांनी आपल्या अनुभवी नेत्यांवर संघटनात्मक जबाबदारी सोपवली आहे. लातूर जिल्ह्यातील एक प्रभावी व्यक्तिमत्त्व,विलास को–ऑपरेटिव्ह बँकेचे उपाध्यक्ष आणि लातूरचे माजी उपनगराध्यक्ष (माजी उपमहापौर) ड.समद पटेल यांची या निवडणुकीसाठी काँग्रेस पक्षाच्या वतीने निरीक्षक (OBSERVER) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. अनुभवी नेतृत्वावर विश्वास ड.समद पटेल हे काँग्रेस पक्षातील एक निष्ठावान आणि अनुभवी चेहरा आहेत.लातूर शहर महानगरपालिकेतील त्यांचा प्रशासकीय अनुभव (माजी उपमहापौर),तसेच विलास को–ऑपरेटिव्ह बँकेसारख्या मोठ्या संस्थेतील उपाध्यक्षपदामुळे सहकार आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कामाची त्यांना सखोल माहिती आहे.त्यांच्या या अनुभवाचा फायदा औसा नगर परिषद निवडणुकीत पक्षाला होईल आणि औसा नगरपरिषदेवर महाविकास आघाडीचा झेंडा फडकेल या उद्देशाने पक्षश्रेष्ठींनी त्यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपवली आहे. ड. समद पटेल यांच्यावर सोपवलेल्या प्रमुख जबाबदाऱ्या पक्ष निरीक्षक म्हणून ड. समद पटेल हे औसा निवडणुकीच्या अनुषंगाने पक्षाच्या कार्याचे नेतृत्व करतील. त्यांच्या प्रमुख जबाबदाऱ्यांमध्ये पुढील बाबींचा समावेश आहे: उमेदवार निवड आणि प्रचार:– औसा नगर परिषदेसाठी सक्षम आणि विजयी उमेदवारांची निवड प्रक्रिया पूर्ण करणे,तसेच पक्षाच्या प्रभावी प्रचार यंत्रणेची आखणी आणि अंमलबजावणी करणे. रणनीती आणि समन्वय:– स्थानिक काँग्रेस कार्यकर्ते, पदाधिकारी आणि इच्छूक उमेदवारांमध्ये समन्वय साधून निवडणुकीसाठी प्रभावी रणनीती (Strategy) तयार करणे. मतदारांशी संवाद:– पक्षाची ध्येयधोरणे मतदारांपर्यंत पोहोचवण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे. पक्षश्रेष्ठींना अहवाल:– निवडणुकीच्या तयारीचा आणि स्थानिक राजकीय परिस्थितीचा नियमित अहवाल पक्षश्रेष्ठींना सादर करणे. औसा नगर परिषद निवडणुकीत निरीक्षक म्हणून करण्यात आलेल्या ड.समद पटेल यांच्या नियुक्तीमुळे काँग्रेस पक्षाला एक अनुभवी आणि कुशल नेतृत्व मिळाले असून,पक्षाच्या विजयाच्या आशा पल्लवित यामुळे झाल्या आहेत. ड.पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली काँग्रेस पक्ष औसा नगरपरिषद निवडणुक अधिक ताकदीने लढवेल अशी अपेक्षा स्थानिक काँग्रेस कार्यकर्त्यांनी व्यक्त केली आहे.



## लव्हुरी येथील श्री.बडेबाबा विद्यामंदिर,या शाळेतील अनियमिततेची चौकशी न झाल्याने उपोषण सुरु

### उपोषणाला तीन दिवसांचा कालावधी उलटला तरी प्रशासनाचे दुर्लक्ष– उपोषणकर्त्यांचा आरोप




केज/प्रतिनिधी केज तालुक्यातील लव्हुरी येथील श्री बडेबाबा विद्यामंदिर या शाळेच्या अनेक बाबतीत अनियमितता झालेली आहे व बोगस कागदपत्राच्या आधारे संस्थेचे रजिस्ट्रेशन करण्यात आलेले आहे. सदर अनिमित्तेबाबत धर्मवीर छत्रपती संभाजी राजे शौर्य प्रतिष्ठान, महाराष्ट्र या संघटने मार्फत व ग्रामपंचायत कार्यालय लव्हूरीच्या वतीने आपल्याला वारंवार निदर्शनास आणून देऊनही आपण त्यावर कुठलीही कार्यवाही न केल्याने धर्मवीर छत्रपती संभाजीराजे शौर्य प्रतिष्ठान,संघटना व ग्रामपंचायत कार्यालयच्या वतीने लोकशाही मार्गाने आमरण उपोषण सुरू केले आहे, या आमरण उपोषणाचा तीन दिवसांचा कालावधी उलटला आहे तरी आंदोलन कर्ते हे त्यांच्या मागण्यावर ठाम आहेत.उपोषणाला तीन दिवसांचा कालावधी उलटला तरी प्रशासनाचे दुर्लक्ष आहे असा आरोप उपोषणकर्त्यांनी केला आहे. सदरील उपोषणाला शासकीय कर्मचारी यांनी कोणीही भेट देण्यासाठी आले नाहीत.परंतु श्री बडेबाबा विध्यालयाचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षकांनी येऊन उपोषण सोडण्यासाठी विनंती केली. आम्ही तुमच्या सर्व विषय मार्गी लाऊत आम्हाला वेळ द्या असा आग्रह केला.परंतु उपोषणकर्ते जोपर्यंत आमच्या सर्व मागण्या मान्य होत नाही तोपर्यंत आम्ही उपोषण सोडणार नाही या भुमिकेवर ठाम आहेत. शाळेच्या मुख्याध्यापक व शिक्षक यांनी केलेले प्रयत्न असफल ठरला. उपोषणाच्या दुसऱ्या दिवशी संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती खांडेकर मॅडम यांनी उपोषण स्थळाला भेट देऊन उपोषणकर्त्यांचे प्रश्न जाणून घेतले व उपोषणकर्त्यांना उपोषणापासून परावृत्त करण्यासाठी विनंती केली परंतु उपोषण कर्ते हे त्यांच्या भूमिकेवर ठाम असल्यामुळे व त्यांनी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर श्रीमती खांडेकर मॅडम यांना देता न आल्याने उपोषण सोडण्यासाठी आलेल्या संस्थेच्या अध्यक्ष श्रीमती खांडेकर मॅडम यांनाही काढता पाय घ्यावा लागला.

## शहरातील वाढत्या ऑटो मुळे नवीन परमीट वाटप तात्काळ थांबविण्याची व्ही एस पँथर्स ची मागणी

लातूर : लातूर शहरात ऑटो ची संख्या जास्त प्रमाणात असल्याने आहे त्या ऑटो चालकाला कुटुंबाची गुजराण करणे अवघड झाले आहे तसेच ऑटो संख्या खूप वाढल्याने वाहतुकीची कोंडी वारंवार होत आहे हे टाळण्यासाठी व्ही एस पँथर्स ऑटो संघटनेच्या वतीने सं अध्यक्ष विनोदभाऊ खटके आणि प्रदेशाध्यक्ष सचिनभाऊ मस्के यांच्या मार्गदर्शनाखाली ऑटो संघटनेचे जिल्हाध्यक्ष देवा गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली उप प्रादेशिक परिवहन कार्यालयात जाऊन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांची भेट घेऊन लातूर शहरातील वाहतूक कोंडी या समस्येवर चर्चा करण्यात आली आणि नवीन परमीट वाटप तात्काळ थांबविण्यात यावेत अशी मागणी करण्यात आली. या निवेदनावर ऑटो युनियन जिल्हाध्यक्ष देवा गायकवाड, जिल्हाउपाध्यक्ष विलास कसबे ,तालुकाध्यक्ष विशाल गवळी, शहर संघटक गणेश कसबे,कामगार आघाडी शहर उपाध्यक्ष युनूस शेख, शहर उपाध्यक्ष तात्याराव मस्के बापू सरवदे राजू पठाण विठ्ठल मस्के इत्यादीच्या स्वाक्षरी आहेत ..



# उदगीर नगरपरिषद निवडणूकिसाठी रवींद्र काळे यांची काँग्रेसचे निरीक्षक म्हणून नियुक्ती

उदगीर/ प्रतिनिधी :– काँग्रेस पक्षाकडून आगामी उदगीर नगरपरिषद निवडणुकीसाठी संघटनात्मक बांधणी मजबूत करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले गेले आहे. काँग्रेसचे प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ,राज्याचे माजी मंत्री दिलीपराव देशमुख,राज्याचे माजी मंत्री आ.अमित विलासराव देशमुख,खा.डॉ. शिवाजी काळगे व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष धीरज विलासराव देशमुख यांच्या सूचनेनुसार जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांनी लातूर जिल्ह्यातील अनुभवी, विलास सहकारी साखर कारखान्याचे माजी व्हॉ. चेअरमन तथा विद्यमान संचालक रवींद्र काळे यांची या उदगीर नगरपरिषद निवडणुकीसाठी पक्षाच्या वतीने निरीक्षक (Observer) म्हणून नियुक्ती केली आहे. काँग्रेस पक्षाचे उदगीर नगर परिषद निवडणूक निरीक्षक रवींद्र काळे यांना साखर कारखाना आणि सहकार क्षेत्रातील कामाचा मोठा अनुभव असून,त्यांचा जनसंपर्क देखील मोठा आहे. सहकार क्षेत्रातील त्यांचे काम,कार्यकर्त्यांशी असलेले त्यांचे सलोख्याचे संबंध आणि प्रशासकीय अनुभव लक्षात घेऊन पक्षाने त्यांच्यावर उदगीर नगरपरिषद निवडणुकीसाठी महत्त्वपूर्ण जबाबदारी देत विश्वास टाकला आहे.रवींद्र काळे यांच्या या निवडीमुळे ते पक्षातील सर्वांना सोबत घेऊन उदगीर नगर परिषदेवर काँग्रेसचा झेंडा फडकावणार असा विश्वास काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांनी व्यक्त केला आहे. जबाबदारी आणि कार्यक्षेत्र पक्ष निरीक्षक म्हणून रवींद्र काळे यांच्यावर खालील प्रमुख जबाबदाऱ्या असतील: निवडणूक तयारीचा आढावा:– उदगीर शहरातील काँग्रेस पक्षाच्या उमेदवारांची निवड प्रक्रिया,प्रचार यंत्रणा आणि निवडणुकीच्या तयारीचा सविस्तर आढावा घेणे. रणनीती निश्चित करणे:– स्थानिक नेते व कार्यकर्त्यांशी चर्चा करून निवडणुकीची प्रभावी रणनीती (Strategy) तयार करणे आणि त्याची अंमलबजावणी करणे. समन्वय साधणे:– स्थानिक गट–तटांमध्ये समन्वय साधणे,सर्व कार्यकर्त्यांना एकत्र आणून निवडणुकीचे काम करण्यास प्रोत्साहित करणे. अहवाल सादर करणे:– निवडणुकीच्या तयारी संबंधीचा सविस्तर अहवाल वेळोवेळी पक्षश्रेष्ठींना सादर करणे. रवींद्र काळे यांच्या नियुक्तीमुळे उदगीर नगरपरिषद निवडणुकीत काँग्रेस पक्षाला अधिक बळ मिळेल आणि पक्षाची संघटनात्मक बाजू मजबूत होईल,अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



## कुंबेफळ येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत विद्यार्थी दिवस साजरा.

केज/प्रतिनिधी केज तालुक्यातील कुंभेफळ येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक कुंबेफळ शाळेत विद्यार्थी दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. दिनांक ७ नोव्हेंबर २०२५ रोजी महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले व विद्यार्थी दिवस मोठा उत्साहात साजरा करण्यात आला. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे शिक्षण व पुस्तकावर जिवापाड प्रेम करणारे होते.त्यांचा शाळेतील पहिला प्रवेश दिन.त्यांनी प्रताप सिंग हायस्कुल सातारा या शाळेत ७ नोव्हेंबर रोजी प्रवेश घेतला.७ नोव्हेंबर हा विद्यार्थी दिवस म्हणून ओळखला जाऊ लागला. अशी माहिती आपल्या प्रास्ताविकात जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ केंद्र केज मुलांची ता.केज या शाळेचे अपग्रेड मुख्याध्यापक श्री राजाभाऊ दत्तात्रय कदम यांनी सांगितले.या शाळेतील पदवीधर शिक्षक डॉ.रामकिशन मुळे सर, संदीप ठोंबरे सर यांनी सखोल माहिती देऊन मार्गदर्शन केले.शिक्षक श्री आकाश लोंढे, राहुल बचुटे,श्री धपाटे आबासाहेब,शिक्षिका श्रीमती भोरे निलावती आनंदराव मॅडम, श्रीमती उटीकर अंजली गोविंदराव,ट्रेनी शिक्षिका काळे रोहिणी श्रीधर यांनी सविस्तर माहिती दिली.या कार्यक्रमास सर्व शिक्षक, शिक्षिका,पी एम पोषण शक्ती निर्माण योजना कामगार श्रीमती सुवर्णमाला बालासाहेब पवार, विद्यार्थी – विद्यार्थीनी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन इ.७ वी वर्गातील विद्यार्थीनी सिध्दी विजय थोरात यांनी केले.शेवटी शिक्षक राहुल बजरंग बचुटे सर यांनी आभार मानले.



# पहिल्या पत्नीने जाब विचारला म्हणुन तिच्यावर 'वस्तऱ्याने' केला वार

केज/प्रतिनिधी केज शहरातील क्रांतीनगर भागात राहणाऱ्या पती–पत्नीमधील किरकोळ वाद विकोपाला गेल्यामुळे, पहिली पत्नी माहेरी असताना पतीने अवघ्या चार महिन्यांतच ह दुसऱ्या महिलेसोबत लग्न केल्याची धक्कादायक घटना केज शहरात घडली आसून. पहिल्या पत्नीने आपल्या पतीला याचा जाब विचारला असता, पतीने तिच्या कपाळावर धारदार वस्तऱ्याने वार करून इतर तिघां जणा सोबत संगनमत करून पहिल्या पत्नीला बेदम मारहाण केल्या प्रकरणी पहिल्या पत्नीच्या फिर्यादीवरून पती विरुद्ध केज पोलिसात गून्हा नोंद झाला आहे. शहरातील क्रांतीनगर भागात राहणारे सतीश लांडगे व त्यांची पत्नी अंजना लांडगे यांच्यात गेल्या चार महिन्यांपूर्वी झालेल्या किरकोळ भांडणामुळे अंजना लांडगे या क्रांतीनगर येथील मुलाच्या घरी राहत होत्या. याच दरम्यान, सतीश लांडगे यांनी दुसऱ्या महिलेशी लग्न करून तिच्यासोबत राजरोस राहण्यास सुरुवात केली. नवऱ्याच्या दुसऱ्या लग्नाची माहिती मिळताच अंजना लांडगे यांनी याबाबत आपल्या पतीकडे विचारणा केली, व सामान आणि घर बांधण्यासाठी दिलेले २ लाख रुपये परत मागितले आसता, सतीश लांडगे यांनी त्यांना घराबाहेर हाकलून दिले. अंजना लांडगे यांचा मुलगा आणि सून ७ नोव्हेंबर रोजी सकाळी ८–३० वाजता ऊस तोडणीसाठी साखर कारखान्यावर गेले असताना, अंजना लांडगे या घरी एकट्या असल्याच्या संधीचा फायदा घेऊन,पती सतीश लांडगे याच्यासह अलका रोहीदास मुजमुले, किरण रोहीदास मुजमुले आणि कुणाल रोहीदास मुजमुले हे चौघेजण त्यांच्या घरात घुसले. व त्यांनी अंजना लांडगे यांना शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली आणि जीवे मारण्याची धमकी दिली. पती सतीश लांडगे यानी क्रूरतेची परिसीमा गाठत अंजना लांडगे यांच्या कपाळावर धारदार वस्तऱ्याने वार करून त्यांना गंभीर जखमी केले. या घटनेनंतर अंजना लांडगे यांच्या फिर्यादी वरून पती सतीश लांडगे, अलका मुजमुले, किरण मुजमुले आणि कुणाल मुजमुले या चौघांविरुद्ध केज पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली जमादार त्रिंबक सोपने हे पुढील तपास करीत आहेत.




हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं.१०, मनपा शॉपींग कॉम्पलेक्स, गांधी चौक, लातूर-४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास खडक हनुमान मंदिर मिलिंद नगर लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.